बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादकःबाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | गुरूवार,दि.२४ एप्रिल २०२५ |वर्षे४थे| अंक२५२वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# पाकिस्तानची जलकोंडी

सिंधू जलवाटपाला स्थगिती ▸ पहलगाम हल्ल्यानंतर केंद्राचा निर्णय ▸ अटारी सीमा देखील केल्या बंद ▸ नागरिकांना देश सोडण्याचे आदेश

पुण्यभूमी प्रतिनिधी

दिल्ली: पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरोधात कडक पावले उचलायला सुरुवात केली आहे. पाकिस्तानी नागरिकांना पुढील ४८ तासांत देश सोडण्याचे आदेश दिले. तसेच अटारी वाघा बॉर्डर १ मेपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय भारताने घेतला. त्याही पुढे जाऊन भारताने पाकिस्तानची पाणी कोंडी करत सिंधू जल वाटप कराराला स्थगिती दिली. हा पाकिस्तानसाठी सर्वात मोठा दणका आहे.

दरम्यान, अतिरेक्यांना धडा शिकवण्यासाठी चोख प्रत्युत्तर देण्याची तयारी भारत सरकारने केली असून, अतिरेक्यांचे अड्डे उद्ध्वस्त करण्यासाठी भारतीय लष्कराला पूर्ण स्वातंत्र्य दिले आहे. एवढेच नव्हे, तर कारवाईसाठी तिन्ही लष्करी दलाला सज्ज राहण्याचे आदेश दिले आहेत. जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी मंगळवारी अंदाधुंद गोळीबार केला होता. या या गोळीबारात २८ पर्यटकांचा जीव घेतला. हे दहशतवादी पाकिस्तामध्ये परत गेल्याची माहिती आहे. त्यानंतर भारताने आता पाकिस्तानविरोधात कडक पावले उचलली आहेत. भारताकडून सिंधू जल कराराला स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे पाकिस्तानच्या ८० टक्के पाणीपुरवठ्यावर परिणाम होणार आहे.पाणीवाटपाला प्रथमच स्थगिती भारत आणि पाकिस्तानमध्ये सिंधू नदी पाण्याच्या वाटपासंदर्भात १९६० साली एक करार झाला होता. भारत आणि पाकिस्तानमध्ये तीन मोठी युद्धे झाली. त्यावेळीदेखील हा करार पाळण्यात आला होता. त्या कराराला आता स्थगिती देण्याचा निर्णय भारताने घेतला.





## सिंधू नदीवर पाकची र्थव्यवस्था

पाकिस्तानच्या सधन असलेल्या पंजाब प्रांतासह मोठा प्रदेश सिंधू नदीच्या खो-यात वसतो. पाकिस्तानमधील शेती असो वा उद्योग, हे सिंधू नदीच्या खो-यात वसले आहेत. या नदीमुळे पाकिस्तानची शेती फुलली आहे. मोठे जलविद्युत प्रकल्पही याच नदीवर आहेत. याचा फायदा पाकिस्तानलाच होतो. आता कराराला स्थगिती दिल्याने पाकची कोंडी होऊ शकते.

## ४८ तासांत देश सोडा, पाक नागरिकांना आदेश

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज जवळपास अडीच तास चाललेल्या कॅबिनेट कमिटी ऑन सेक्युरिटीच्या बैठकीत पाच प्रमुख निर्णय घेण्यात आले. यावेळी हल्लेखोरांना पाकिस्तानचा पाठिंबा यावरून प्रहार केला. यासंदर्भात पाकिस्तानवर थेट आरोप करीत भारताने पाकिस्तानी दुतावास बंद केला असून, पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा रद्द केले. यासोबत सिंधू पाणी कराराला स्थगिती दिली. तसेच अटारी चेकपोस्ट बंद करण्याचा निर्णयही घेण्यात आला. सार्क अंतर्गत पाकिस्तानी नागरिकांना देण्यात येणारी व्हिसा सूट रद्द करण्यात आली आणि त्या अंतर्गत भारतात राहणा-या पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांत देश सोडण्यास सांगितले. भारताने इस्लामाबादमधून सल्लागारांनाही परत बोलावले असून, उच्चायुक्तांची संख्या ३० पर्यंत कमी करण्याचा निर्णयही घेण्यात आला. यासंबंधीची माहिती परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी दिली.

# साक्षी कांबळे आत्महत्या प्रकरणी आरोपीवर मोक्का लावा

## ऑल इंडिया पँथर्स संघटनेची मागणी!




पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: के.एस.के. महाविद्यालयात तृतीय वर्षात शिकणारी साक्षी कांबळे हिच्यावर झालेला अन्याय आणि तिच्या आत्महत्येस कारणीभूत ठरलेल्या गुन्हेगारी कृत्यांमुळे बौद्ध समाजासह संपूर्ण समाजात प्रचंड संताप आहे. साक्षी ही एक होतकरू आणि कष्टाळू विद्यार्थिनी होती. तिचे लग्न २० एप्रिल २०२५ रोजी ठरले होते. परंतु, महाविद्यालयातील गुंड प्रवृत्तीच्या नराधम आरोपीने तिचे खासगी फोटो व्हायरल करण्याची धमकी देऊन तिला ब्लॅकमेल केले. तिचे लग्न मोडण्याची धमकी देऊन तिच्यावर मानसिक दबाव टाकला. या अमानुष त्रासाला कंटाळून साक्षीने आपल्या मामा यांच्या घरी जाऊन फाशी घेऊन आत्महत्या केली. हे प्रकरण अत्यंत गंभीर असून, यातून बीड जिल्ह्यातील वाढती गुन्हेगारी, महिलांवरील अत्याचार आणि शैक्षणिक संस्थांमधील असुरक्षित वातावरण उघडकीस येते. या प्रकरणात तातडीने आणि कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. यासंदर्भात खालील मागण्या सादर करीत आहोत: आरोपीवर यापूर्वीही गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे त्याच्यावर मोक्का कायद्यांतर्गत कठोर कारवाई करावी. साक्षीला आत्महत्येस प्रवृत्त करण्यात तिच्या बहिणीचा सहभाग असल्याचा संशय आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून तिला सहआरोपी म्हणून समाविष्ट करावे. साक्षी शिकत असलेल्या के. एस.के. महाविद्यालयात यापूर्वी दोन मुलींनी आत्महत्या केल्या आहेत. यामुळे महाविद्यालयात मुलींच्या शोषणाचे मोठे रॅकेट सक्रिय आहे का, याची सीआयडीमार्फत चौकशी करावी. बीड जिल्ह्यात साक्षी कांबळे प्रकरण, वकील ज्ञानेश्वरी मारहाण ▸▸ पान २ वर

# पहलगाम भ्याड हल्ल्याचा निषेध

## निदर्शने:बीड जिल्हा शिवसेना आक्रमक!




पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे पाकधार्जिण्या अतिरेक्यांनी पर्यटकांवर केलेल्या गोळीबार भ्याड हल्लूयामुळे असंख्य निष्पाप पर्यटकांचा मृत्यू झाला तसेच या घटनेमुळे देशभरात मोठ्या प्रमाणात दहशतीचे वातावरण निर्माण झाले. पाकधार्जिण्या अतिरेक्यांनी पर्यटकांवर केलेल्या भ्याड हल्लूयाच्या निषेधार्थ आज दुपारी १२.०० वाजताच्या दरम्यान धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले. दरम्यान संतप्त शिवसैनिकांनी अतिरेक्यांच्या फोटोला जोडे मारत मुडदाबाद मुडदाबाद पाकिस्तान मुडदाबाद अशा घोषणा दिल्या. भारत देश यशाची उंची गाठत असताना वारंवार पाकधार्जिन अतिरेकी दहशत पसरवण्यासाठी असे भ्याड हल्ले करतात. देशातील निष्पाप लोकांचे बळी घेतात. ▸▸ पान २ वर

# माजलगावात एकाच्या डोक्यात दगड घालून केले जखमी

## शहरातील गजबजल्या ठिकाणी जीवघेणा हल्ला!

पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव: बीड जिल्ह्यात गुन्हेगारी व गुन्हेगारांचे मनोबल उंचावलेले दिसून येत आहे एकापाठोपाठ एक घटनेमुळे जिल्हा प्रकाश झोतात आला आहे. बीड आष्टी परळी केज यानंतर माजलगाव शहरात घडलेल्या दोन घटनांमुळे जिल्ह्यात पुन्हा गुन्हेगारीने डोके वर काढले असल्याचे दिसून येत आहे. दोनच दिवसापूर्वी एका ढाबा चालकाला मध्यस्थी केल्याच्या कारणावरून मारहाण करण्यात आली होती यामध्ये गायकवाड नामक व्यक्तीचा नाहक जीव गेला. काल पुन्हा माजलगाव शहरातील महिंद्र शोरूम समोर तालुक्यातील गावातील दोन व्यक्तींच्या अंतर्गत वादामुळे एका व्यक्तीने थेट भला मोठा दगड समोरच्या व्यक्तीच्या डोक्यात मारला. सदरील व्यक्ती गंभीर रित्या जखमी झाला असून त्या व्यक्तीला माजलगाव



शहरातील एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जिल्ह्यात दररोज मारहाणीच्या घटना खुल्यामपणे घडत असल्याने बीड जिल्हा गुन्हेगारी पार्श्वभूमीमुळे रेड झोनमध्ये आला आहे का?

माजलगाव तालुक्यातील लवूळ येथील उत्तम बाबुराव विग्ने या व्यक्तीसोबत गावातीलच एका तरुणाचे अज्ञात कारणावरून भर रस्त्यात भांडण झाले. संतापलेल्या आरोपीने ताबडतोब विग्ने यांच्या दिशेने अत्यंत जवळून भला मोठा दगड थेट डोक्यावर मारल ही घटना समोरच असलेल्या महिंद्रा शोरूमच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली. वैयक्तिक भांडणाचे कारण कोणतेही असो मात्र एखाद्याला जीवे मारण्याच्या उद्देशाने थेट हल्ला करणे यामागे नक्कीच मोठे करण असू शकते. मात्र आरोपींचे मनोबल एवढे उंचावले आहे की एखादा चा जीव घेण्यासाठी बीड जिल्ह्यात मागेपुढे पाहिले जात नसल्याचे अनेक घटनांमधून दिसून येत आहे. मसाजग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर बीड जिल्हा राज्याच्या केंद्रस्थानी ठरला आहे. यानंतर अनेक घटना बीड जिल्ह्यात घडल्या. काही दिवसांपर्वीच निलंबित पीएसआय रणजीत कासले यांच्या बेछूट वक्तव्यामुळे अनेक वाद जिल्ह्यात निर्माण झाले होते. या सर्व प्रकरणावर पडदा पडताच अंबाजोगाई तालुक्यातील एका वकील तरुणीस गावातील सरपंच यांच्यासह त्यांच्या समर्थकांनी गंभीर मारहाण केली चे प्रकरण ▸▸ पान २ वर

# अवैधपणे दारुचा गुत्ता चालवणाऱ्या तीन महिलांवर कारवाई



पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगांव : येथील शहर पोलीसांना मिळालेल्या गोपनिय माहीतीच्या आधारे पोलीसांनी गौतमनगर माजलगांव येथे दि २३ एप्रिल बुधवार रोजी दुपारी ०३.१० वाजण्याच्या सुमारास छापा टाकुन तेथे अवैधरित्या दारुचा गुत्ता चालवण्याऱ्या महीला नामे अरुणाबाई प्रकाश मेंडके,निर्मला भागवत मेंडके, आश्विनी बालाजी मॅडके तीन्ही रा. गौतमनगर माजलगांव यांचे ताब्यातुन गावठी हातभट्टीची तयार दारु, गावठी हातभट्टीची दारु तयार करण्यासाठी उपयोगात येणारे गुळमिश्रीत आंबट व उग्रट वास येत असलेले रसायण, लाकडी दिवान, टेबल,बेंच,लोखंडी बॅरल,प्लास्टीचे बकेट,प्लास्टीकचे ड्रम,काचेचे ग्लास, प्लास्टीक मग असा एकुण ७९,९००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त ▸▸ पान २ वर

आंदोलन

## लोकलढा आंदोलनच्या मादळमोही बैठकीत निर्धार

# जायकवाडीच्या पाण्यासाठी टाळ-मृदंग मोर्चा

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीडः शेती पिकांसाठी पाण्यावाचून हालहाल झालेल्या बीड जिल्ह्यातील दुष्काळी भागाल जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे, नदीजोड प्रकल्प व मराठवाडा वॉटर ग्रीड योजना गतीने राबवावी यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर लोकलढा आंदोलनाच्या वतीने टाळ-मृदंग मोर्चा काढण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला. लोकलढा आंदोलनातील शेतकऱ्यांची मादळमोही (ता. गेवराई) येथे झालेल्या बैठकीत हा निर्धार करण्यात आला. यावेळी भाऊसाहेब जरांगे पाटील, अजय साळुंके पाटील, बप्पासाहेब अण्णा तळेकर, ॲड. संजय काळे, राजाभाऊ महाराज कुटे, सरपंच नवनाथ गवते, उपसरपंच परमेश्वर



कोळेकर, सरपंच नंदकुमार शिंदे, विजयकुमार करपे, माजी सरपंच गणेश कोळेकर, रमेश जिजा तळेकर, अप्पासाहेब महानोर, राहुल लोंढे, समन्वयक दिनेश गुळवे, बाळासाहेब कोळेकर, देविदास चव्हाण, चंद्रहंस महाराज जाधव, गणेश हाडुळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आपल्या दुष्काळी भागात शेतीला पाणी मिळावे यासाठी शेतकऱ्यांनी एकत्र येत लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाचे गेल्या वर्षभरातील काम व पुढील आंदोलन यावर या बैठकीत चर्चा करण्यात आली. यावेळी राजेंद्र गवते, दत्तात्रय सिरसट, दिलीप अलगुडे, शामराव घुगे, वसंत पवळ, रावसाहेब बोर्डे, दीपक कुलकर्णी, आकाश हाकाळे, संतोष नेमाने, अजिनाथ शिंदे, बप्पासाहेब रत्नपारखे, सोमनाथ मोरे, अजय पाटील, ज्ञानेश्वर तांबारे, संतोष गोरे, गणेश लवारे, रमेश जगदाळे आदी उपस्थित होते. यावेळी संजय काळे ▸▸ पान २ वर

# वाचनालया ग्रंथपाला विनाच?

## बोंबला:वाचनालयाला कोणी वालीय का




पुण्यभूमी प्रतिनिधी

केज: तालुक्यातील चिंचोली माळी येथील वाचनालयाला कुणी वाली आहे का नाही समजेना झाले आहे कारण कधी बंद असते तर अधी चालू कुठल्याही प्रकारे नियमानुसार वाचनालय सुरू नसल्याचे समजले जाते आहे तसेच ग्रंथपालाची खुर्चीवर कोन आहे का नाही समजले जात नाही कारण ग्रंथपालाची खुर्ची कायम रिकामी असते तेथे कोणी आहे का नाही समजले जात नाही तसेच चिंचोली माळी येथील वाचनालयाला कुठल्याही प्रकारचे वेळेचे बंधन नाही कधी सुरू असते तर कधी बंद असते नेमके वाचनालय चालवतय कोण असा प्रश्न नागरिकांना पडला आहे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे मनमानी कारभारानुसार ▸▸ पान २ वर

## मानवतेची हत्या

काश्मीरमध्ये मंगळवारी गत सहा वर्षांतील सर्वांत मोठा दहशतवादी हल्ला झाला. दहशतवाद्यांनी यावेळी पर्यटकांना लक्ष्य केले. पहलगाममधील 'छोटे स्वित्झर्लंड' म्हणून ओळखल्या जाणा–या बैसरन भागात दहशतवाद्यांनी पर्यटकांवर गोळीबार केला. नाव आणि धर्म विचारून त्यांच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या. या गोळीबारात २७ पर्यटकांचा मृत्यू झाला असून २० हून अधिक जखमी झाले आहेत. मृतांमध्ये महाराष्ट्रातील सहा जणांचा समावेश आहे. त्यात डोंबिवलीचे तिघे, पुण्यातील दोघांचा तर पनवेलमधील एका रहिवाशाचा समावेश आहे. असे सांगण्यात येते की, १० दहशतवाद्यांनी बेछूट गोळीबार केला. १० दहशतवाद्यांमध्ये ६ जण स्थानिक तर ४ दहशतवादी परदेशी होते. पहलगाममधील दहशतवादी हल्ला हा पाकिस्तानच्या सुनियोजित कटाचा भाग आहे असे सांगण्यात येत आहे. या कटात पाकिस्तानने लष्कर–ए–तैयबा आणि जैश–ए–मोहम्मदसारख्या बंदी घातलेल्या दहशतवादी संघटनांचा वापर केला आहे. मंगळवारचा हल्ला अमरनाथ यात्रा सुरू होण्यापूर्वी यात्रेकरू आणि पर्यटकांमध्ये भीती पसरवण्यासाठी करण्यात आला आहे. टीआरएफ संघटना काश्मीरमध्ये मोठे आव्हान बनण्याची शक्यता आहे. या संघटनेला लक्ष्य साधण्यासाठी जंगलात किंवा उंच ठिकाणी लपून बसण्याबद्दलची चांगली माहिती आहे. टीआरएफला फाल्कन स्क्वॉड असेही संबोधतात. हा गट 'हिट ॲण्ड रन' या धोरणावर काम करतो. त्यांच्याकडे प्रगत शस्त्रास्त्रे आहेत. टीआरएफ हा लष्कर–ए–तैयबाचाच एक छोटा गट आहे.

या दहशतवाद्यांनी काही दिवसांपूर्वी पहलगाममध्ये रेकी केली होती आणि संधी मिळताच हा हल्ला केला. दहशतवाद्यांनी पर्यटकांवर गोळ्या झाडल्यानंतर घटनास्थळावरून पळ काढला. बाजूच्या जंगलात ते पळून गेले. टीआरएफ या दहशतवादी संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. हल्लेखोर पोलिसांच्या गणवेशात आले होते. पर्यटकांना धर्म विचारून त्यांनी गोळ्या झाडल्या. हल्ल्याची माहिती मिळताच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तातडीने जम्मू–काश्मीरमध्ये दाखल झाले. हल्लेखोरांना सोडणार नाही असा इशारा त्यांनी दिला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, जम्मू–काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्यासह देशभरातील अनेक नेत्यांनी नि:शस्त्र पर्यटकांवर झालेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध केला आहे. काश्मीरमध्ये यंदा मोठ्या संख्येने देशी–विदेशी पर्यटक दाखल झाले आहेत. पहलगाम शहरापासून सहा किलोमीटरवरील बैसरनचे गवताळ पठार हे पर्यटकांचे आवडते ठिकाण आहे. मंगळवारी दुपारी तीनच्या सुमारास अनेक पर्यटक खान–पानाचा आनंद घेत असताना दहशतवाद्यांनी त्यांच्या दिशेने बेछूट गोळीबार केला. त्यामुळे पर्यटकांमध्ये गोंधळ उडाला. मोकळे मैदान असल्यामुळे पर्यटकांना कुठे लपण्याची संधीही मिळाली नाही. अंदाधुंद गोळीबार करून अतिरेकी पळून गेले.

स्थानिक लोकांनी खेचरावरून जखमींना रुग्णालयात नेल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. बैसरन खो–यात अरुंद वाट असल्याने चालत किंवा खेचरावरून जावे लागते. दहशतवादी टेकडीवरून खाली उतरले आणि त्यांनी ४० पर्यटकांना घेरून त्यांच्यावर गोळीबार केला. याआधी पहलगाममध्ये अमरनाथच्या तळावर २००० मध्ये झालेल्या हल्ल्यात ३० जण ठार तर ६० हून अधिक जखमी झाले होते. बैसरनमध्ये मोठ्या संख्येने अनेक पर्यटक उन्हाळ्याची सुटी घालवण्यासाठी आले आहेत. त्यामुळे स्थानिक वाहतूक सेवा, शिकाराचालक, हाऊसबोट चालक आणि हॉटेलचा व्यवसाय तेजीत आहे. मात्र आता तेथे दहशतवादी हल्ला झाल्याने या सर्वांच्या उत्पन्नावर गदा आली आहे. या हल्ल्यामुळे जम्मू–काश्मीरमध्ये सावधानतेचा इशारा देण्यात आला. ठिकठिकाणी नाकाबंदी करण्यात आली, सामानाची तपासणीही करण्यात येत होती. सुरक्षिततेची उपाययोजना म्हणून जम्मू–श्रीनगर राष्ट्रीय महामार्ग १–ए बंद करण्यात आला. त्यामुळे पर्यटकांना वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागला. पहलगाममधील हल्ल्याशी पाकिस्तानचा काहीही संबंध नसल्याचे पाकचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनी म्हटले आहे.त्यांनी या हल्ल्यासाठी भारतालाच जबाबदार धरले आहे. भारतातील लोकांचाच यात हात आहे. भारतातील अनेक राज्यांत सरकारविरोधात रोष आहे. नागालँडपासून काश्मीर आणि छत्तीसगड, मणिपूरमध्ये लोक सरकारविरोधात आहेत. भारत सरकार लोकांच्या हक्कांवर गदा आणत आहे, त्यांचे शोषण करत आहे. अल्पसंख्याकांचे शोषण होत आहे. त्याविरोधात लोक उभे आहेत. आमचा याच्याशी काही संबंध नाही, आम्ही दहशतवादी कृत्यांचे समर्थन करत नाही असे आसिफ म्हणाले. दहशतवादी हल्ल्यानंतर पंतप्रधान मोदी सौदी अरेबियाचा दौरा अर्धवट सोडून दिल्लीत परतले. दिल्ली विमानतळावरच त्यांनी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल, परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर आणि परराष्ट्र सचिवांसोबत बैठक घेतली. गृहमंत्री अमित शहा जम्मू–काश्मीरमधील परिस्थितीचा आढावा घेत आहेत. दहशतवाद्यांना पकडण्यासाठी सुरक्षा यंत्रणांनी कारवाई सुरू केली आहे.पहलगाम हल्ल्यानंतर आपल्यावर सर्जिकल स्ट्राईक होतो की काय अशी पाकिस्तानला भीती वाटत आहे. तेथे पाकिस्तानी हवाई दल अलर्ट मोडवर होते. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला असून दहशतवादाविरोधात देश एकजूट आहे असे म्हटले आहे. जम्मू–काश्मीरमध्ये परिस्थिती सामान्य असल्याचा फसवा दावा करण्याऐवजी सरकारने या प्रकरणी जबाबदारी घेत ठोस पावले उचलावीत असे म्हटले आहे. दहशतवादी हल्लेखोरांना आणि सूत्रधारांना आम्ही सोडणार नाही. दहशतवादी अजेंडा कधीच यशस्वी होणार नाही असे पंतप्रधान मोदींनी म्हटले आहे. दहशतवादाविरुद्धचा लढा आता अंतिम टप्प्यात आला असून त्याचा सोक्षमोक्ष लावण्यासाठी भारतीयांनी आपसातील मतभेद विसरून एक झाले पाहिजे. मानवतेची हत्या करणा–यांना जिवंत राहण्याचा अधिकार नाही.

# जात प्रमाणपत्र पडताळणीची मोहीम

## समता पंधरवडा:आदित्य शिक्षण संस्थेतेचा पुढाकार

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:अनुसूचीत जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग व सामाजिक आर्थिक मागास प्रवर्ग एस .ई. बी. सी. (मराठा) या मागास प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, बीड यांचे वतीने महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीचे औचित्य साधून 'समता पंधरवडा' या विशेष मोहिमेचे आयोजन बीड शहरातील आदित्य शिक्षण संस्थेत करण्यात आले होते.

'समता पंधरवडा' कालावधी १ ते १४ एप्रिल दरम्यान राबवण्यात आला. यामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळणे साठी विशेष मोहिम राबवण्यात आली. आदित्य शिक्षण संस्थेत आयोजित कार्यक्रमाला संगणक विभाग प्रमुख प्रा. सलीम शेख, कार्यालयीन अधीक्षक जात पडताळणी कार्यालय बीडचे गणेश शेजाळ, प्रकल्प अधिकारी बार्टी ज्ञानोबा मात्रे, समतादूत बार्टीचे ज्ञानोबा गुजर, सहाय्यक जातपडताळणी कार्यालय बीड च्या साधना मस्के यांची उपस्थिती होती. यावेळी गणेश शेजाळ यांनी महाराष्ट्र शासनाने विद्यार्थ्यांसाठी चालू असलेल्या योजना जसे की स्वाधार योजना,पंडीत दीनदयाल स्वयम् योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फ ुले आधार योजना या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा, आदित्य पॉलिटेक्निक बीड चे प्राचार्य डॉ. राहुल खडके यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन प्रा. लक्ष्मण तांबे यांनी मानली. यावेळी प्रा. सलीम शेख,प्रा. प्रशांत दुधाळ, प्रा. अजय दुधाळ, प्रा. पी. आर. अ,प्रा. अक्षय राऊत, प्रा. शिवानी जाधव, प्रा. मिन्हाज शेख यांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शुभम पवार, प्रा. प्रियंका नागरगोजे यांनी परिश्रम घेतले.




### स्पर्धा परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना निशुल्क प्रशिक्षण:संजय गुजर

बार्टीचे अधिकारी संजय गुजर म्हणाले की, बार्टी मार्फत एससी, एसटी विद्यार्थ्यांना एमपीएससी, युपीएससी, आयबीपीएस,, जी, नीट, ॠ्‌एए–ढजएॠ्‌, ई घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा करिता 'विना शुल्क अनिवासी प्रशिक्षण' आणी अभ्यास सामग्री दिली जाते. त्याचबरोबर ठरावीक असे प्रती महा विद्या वेतनही पुरवले जाते. तसेच पूर्व परीक्षा पास होऊन मुख्य परीक्षेस पात्र ठरल्यास ठरावीक 'लोकसेवा आयोग व नागरी सेवा परिक्षा' प्रमाने आर्थीक मदत दिली जाते. त्या संदर्भात तज्ज्ञ व्यक्ती मार्फत मार्गदर्शन पुरवले जाते. तसेच महा ज्योती मार्फत महाराष्ट्रातील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती–भटक्या जमाती व विशेष मागास – प्र वर्गाच्या विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक युगात समान संधी प्राप्त व्हावी या हेतूने पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण, गएए/छएएढ/चक्ढ–उएढ, चझडउ, णझडउ आदी स्पर्धात्मक परीक्षांचे प्रशिक्षण देण्यात येते.

### जात वैधता प्रमाणपत्रासाठी शिबिर

प्रकल्प अधिकारी बार्टी ज्ञानोबा मात्रे म्हणाले की, अनुसूचीत जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग, सामाजिक आर्थिक मागास प्रवर्ग एस ई बी सी (मराठा) या मागास प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी करण्यात येत आहे. त्याकरिता संबंधित मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी त्यांचे जात प्रमाणपत्र पडताळणीचे अर्ज लरींळर्शींरश्रळवळीूं.ारहरीरिहींीर.र्सीें.ळप या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने भरून सदर अर्जाची हार्ड कॉपी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, बीड यांचेकडे सादर करावेत. तसेच बीड जिल्हयातील काही महाविद्यालयामध्ये समितीमार्फत शिबिरे आयोजित करण्यात आलेले असून त्याच ठिकाणी संबंधित अर्ज स्वीकारून त्यांना तात्काळ जात वैधता प्रमाणपत्र देण्यात येत असल्याचे ते म्हणाले.

## पान एक वरून

**साक्षी कांबळे आत्महत्या**

प्रकरण, धाबा मालक माजलगाव हत्याकांड, बाबासाहेब आगे हत्याकांड यासारख्या घटनांमुळे गुन्हेगारी वाढली आहे. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी बीड शहरासाठी पोलीस आयुक्त (कमिशनर) आणि ग्रामीण भागासाठी स्वतंत्र पोलीस अधीक्षक (एसपी) नेमावेत. साक्षीच्या कुटुंबाने डीवायएसपी राठोड यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. याची निष्पक्ष चौकशी करून अनुसूचित जाती व जमाती ज्ञानेश्वरी अंजान यांच्यावर सध्या बीड येथे उपचार सुरू असून, त्यांच्यासह त्यांच्या कुटुंबाला देखील जीवितास धोका निर्माण झाल्याची शक्यता आहे.या संदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने निवेदन जिल्हा पोलीस अधिक्षकांना देण्यात आले असून, तात्काळ आरोपींना अटक न केल्यास पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर संबळ आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी मनसेचे महिला राज्य उपाध्यक्षा वर्षा जगदाळे ,उपजिल्हाप्रमुख सदाशिव बिडवे, शहराध्यक्ष अमरजान पठाण, महिला जिल्हाध्यक्ष आशाताई कुटे यांनी पोलीस प्रशासनाने तातडीने कारवाई करून पीडितेला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी केली आहे.

**पहलगाम भ्याड हल्ल्याचा**

मात्र देशाची सुरक्षा यंत्रणा त्यांना शोधण्यासाठी कामाला लागलेली आहे. एक शिवसैनिक म्हणून माझी इच्छा आहे जिथे पाकधर्जिन अतिरेकी दिसतील तिथेच त्यांना गोळ्या घालव्यात ज्याने करून इथून पुढे कुणी आपल्या देशकडे डोळा वर करून पाहायची हिंम्मत करणार नाही. पाकधर्जिन अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याचा बीड जिल्हा शिवसेनेकडून तीव्र जाहीर निषेश व्यक्त करण्यासाठी आम्ही शिवसैनिकांनी रस्त्यावर उतरून हे निषेश आंदोलन केले आहे. अशी प्रतिक्रिया शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी प्रसार माध्यमांना दिली. याप्रसंगी शिवसेना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांच्या समावेत बीड जिल्हा शिवसेना, युवासेना, शेतकरी सेना, ओबीसी सेना, अनुसूचित जाती–जमाती सेना, एसटी कामगारसेना तसेच सर्व अंगीकृत संघटनांचे आजी–माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित उपस्थित होते.

**माजलगावात एकाच्या डोक्यात**

उजेडात आले. या प्रकरणाचे आरोपी अद्यापही अटक नसल्याने जिल्ह्यात संतापाची लाट आहे यातच माजलगाव तालुक्यामध्ये ढाबा चालकाच्या खून प्रकरणामुळे जिल्ह्यात पुन्हा गुन्हेगारी वाढलेली दिसून आली. यातच माजलगाव मध्ये भर रस्त्यावर एका व्यक्तीला दगडाने मारहाण करून जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला सुदेवाने या व्यक्तीचा जीव वाचला असून एका खाजगी रुग्णालयात त्याच्यावर उपचार सुरू आहे. जिल्ह्यात वाढलेल्या गुन्हेगारीने बीड जिल्हा हा रेड झोन मध्ये आला असून माजलगाव तालुका जिल्ह्याच्या केंद्रस्थानी ठरत आहे.

**अवैधपणे दारुचा गुत्ता चालवणाऱ्या**

करण्यात आला असुन त्यांच्याविरुध्द गु.र.नं.१५८/२०२६ कलम ६५ (ई), ६५ (फ), ६८ महाराष्ट्र दारुबंदी कायदा कारवाई करण्यात आली आहे. सदरची कारवाई नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, कमलेश मिना सहा. पोलीस अधीक्षक केज,अति. कारभार उपविभाग माजलगांव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोउपनि माकणे, पोहेकों/माधव तोटेवाड, पोहेकों/गणेश नांगरे, महीला पोहेकॉ प्रभावती ढगे यांनी केली आहे.

**जायकवाडीच्या पाण्यासाठी**

म्हणाले, की शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी शेतीला पाणी गरजेचे आहे. व या पाण्यासाठी आपण संघर्ष करणे गरजेचे आहे. सरपंच नवनाथ गवते म्हणाले, की शेतकरी मुलांचे स्थलांतर रोखण्यासाठी व शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासासाठी पाणी संघर्ष मोर्चा करणे गरजेचे आहे. अप्पासाहेब महानोर यांनी गरज असलेल्या शेतीला व दुष्काळी भागाला पाणी मिळवून देण्यासाठीचा निर्धार व्यक्त केला. अप्पासाहेब वाणी यांनी मोठ्या संघर्षाशिवाय पाणी मिळणार नाही म्हणून शेतकऱ्यांनी आंदोलनात मोठ्या संख्येने उतरावे अशी हाक दिली. शेतीला पाणी मिळावे व शासनाने तात्काळ योजना सुरू करव्यात यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर टाळ–मृदंग मोर्चा काढण्याचा निर्धार यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी केला. दुष्काळी भागात जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे, नदीजोड प्रकल्प व मराठवाडा वॉटर ग्रीड योजना गतीने सुरू करावी यासाठी टोकाचा संघर्ष करणार, असा इशारा यावेळी अजय साळुंके पाटील यांनी दिला.या आंदोलनात शेतकरीव शेतकरी पुत्रांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन गणेश कोळेकर यांनी केले.

**वाचनालया ग्रंथपाला विनाच?**

चिंचोली माळी येथील वाचनालय सुरू आहे व ग्रंथपाल पगार घेऊन मजेत आहे वाचकांना वाचण्यासाठी वाचनालयाचे दार मात्र कायम बंदच दीसत आहे तसेच दुपारच्या वेळी तर कधी चालू असल्याचे नागरिकांन दीसलेच नाही त्यामुळे संमंधीत प्रशासनाने चिंचोली माळी येथील वाचनालयाची चौकशी करण्यात यावी व कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## पान सहा वरून

**वैजेनाथ ट्रस्टीच्या विरोधात**

रमेश फड यांनी गेल्या ३७ दिवसांपासून धरणे आंदोलन व अन्नत्याग उपोषण चालवले आहे. तरीसुद्धा श्री वैजनाथ देवस्थान ट्रस्टने कोणतीही ठोस दखल घेतलेली नाही.याशिवाय, ट्रस्टने गेल्या तीन महिन्यांत मनमानीपणे अनेक बदल केले असून, भ्रष्टाचार व गैरव्यवहार लपवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे ट्रस्टच्या कामकाजाची तात्काळ व सखोल चौकशी करण्यात यावी, अशी विनंती शासनास निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

**चिंचोली माळीत धाब्यावर**

फबद्दल चिंचोली माळी येथील नागरिकांना मध्ये धडाकेबाज कामगिरीचे कौतुक केले जात आहे .

तरी सुद्धा चिंचोली माळी येथील अवैध दारू विक्री करणाऱ्या धाब्यावर कार्यवाही केली जात नाही तरी अशा अवैध दारू विक्री करणाऱ्या धाब्यावाल्यांना वरद हस्त कुनाच आहे पोलीस प्रशासन कार्यवाही करत का नाही असा प्रश्न नागरिकांना पडला आहे नेमका अवैध दारू विक्री करण्यासाठी चिंचोली माळीतील धाब्यावाल्यांना अर्शिवाद कुनाचा आहे असा प्रश्न नागरिकांना पडला आहे तसेच काही धाबे शासकीय कार्यालयांच्या समोरच आहेत तरी सुद्धा प्रशासन गप्प का आहे का शासकीय कार्यालयांच्या समोर दीवसा ढवळ्या अवैध दारू विक्री चिंचोली माळी येथे होत आहे मग काय प्रशासनाने अवैध दारू विक्री करण्यासाठी परवानगी दिली आहे का कारण अशा प्रश्न उपस्थित होतो आहे तसेच चिंचोली माळी येथे दारू पिऊन अनुचित प्रकार घडू लागले आहेत असे प्रकार फक्त दारु पिऊन होऊ लागले आहेत .चिंचोली माळी येथील धाबे राज्यमार्गवर आहेत व येणाऱ्या जाणाऱ्या महीला असतील किंवा शाळेतील लहान मुले असतील यांना रोडवर असणाऱ्या धाब्याचा खुप मोठा त्रास सहन करावा लागत आहे त्यामुळे बीड येथील पोलिस अधीक्षक कॉवत साहेब यांनी चिंचोली माळी येथील अवैध दारू विक्री करणाऱ्या धाब्यावर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे तसेच चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

**पुरवठा विभागा करणार**

आणि ' बं 'अशी वर्गवारी करून या आलेल्या अर्जाची छाननी केली जाणार आहे यामध्ये त्रुटी अथवा चुकीची माहिती आढळल्यास त्यांची शिधापत्रिका रद्द केली जाणार आहे गरीब तसेच गरजूंना अन्नधान्याची गरज असते मात्र काही नागरिक आर्थिक सक्षम असतानाही रेशनचे धान्य उचलत असल्यामुळे आता शासनाने पडताळणी सुरू केली आहे यामुळे ज्याची आर्थिक स्थिती चांगली आहे अशांना या मोहिमेनंतर आपला रेशन धान्या वरील अधिकार सोडावा लागणार आहे यामध्ये कळंब तालुक्यात एकुण रास्त भाव दुकाने– १४३, एकूण कार्ड संख्या– ४२१९५, एकूण सदस्य संख्या– १८८६५१, अंत्योदय कार्ड संख्या– ५३२४, अंत्योदय सदस्य संख्या– २६४५५, प्राधान्य कुटुंब लाभार्थी कार्ड संख्या– ३०१६१, प्राधान्य कुटुंब सदस्य संख्या– १३६६७८, शुभ सकाळ– ३१९१, शुभ्र सदस्य संख्या– १३५५३, अपात्र कार्ड संख्या– ३५१९, अपात्र सदस्य संख्या– ११९६५ अशी कळंब तालुक्यातील कार्ड व सदस्य संख्या आहे या मोहिमेमुळे अनेक कार्ड व सदस्य संख्या कमी होणार आहे अशी माहिती कळंब पुरवठा विभागाच्या निरीक्षण अधिकारी श्रीमती. शिल्पा माळवे यांनी सांगितले आहे.

**महिलेचा विनयभंग करत**

वाजेच्या सुमारास आशाबाई आणि त्यांची सून मनीषा अनिल कोकाट घरामध्ये असताना अचानक संदिपान अरुण कोकाट, शिवराज गंगाधर कोकाट, अरुण सखाराम कोकाट आणि मधुकर मुरलीधर कोकाट सर्व राहणार ठाकर आडगाव हे तेथे दारू पिऊन आले. त्यांनी सासू सुनांना शिवीगाळ केली. संदिपान कोकाट याने वाईट हेतूने आशाबाई कोकाट यांची साडी धरून ओढली आणि विनयभंग केला. त्यांच वेळी त्यांची मुले अनिल आणि कृष्णा हे दोघेही आरडाओरडा करत पळत आले. तेव्हा संदिपान कोकाट, शिवराज कोकाट, अरुण कोकाट आणि मधुकर कोकाटे यांनी त्यांना शिवीगाळ करून काठीने बेदम मारहाण केली. आमच्या नादाला लागाल तर जीवे मारून टाकू अशी जीवे मारण्याची धमकी दिली. मारहाण आणि होणारी आरडाओरड ऐकून गावातील सुदाम कोकाट आणि जगन्नाथ कोकाट हे धावत आले आणि त्यांनी भांडण सोडासोडी केली. अशी तक्रार आशाबाई कोकाटे यांनी तलवाडा पोलीस स्टेशन येथे जाऊन केली. त्या पार्श्वभूमीवर वरील आरोपीतांविरोधात भारतीय न्याय संहिता ७४, ११८(१), ३५२, ३५१(२), ३(५) अन्वय गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सपोनि सोमनाथ नरके यांच्या मार्गदर्शनाखाली याप्रकरणी तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल विठ्ठल राठोड हे करत आहेत. ठाकर आडगाव येथे घडलेल्या या संताप जनक प्रकारामुळे पंचक्रोशीत खळबळ उडाली आहे.

**पोलीसांनी आरोपींना ठोकल्या**

हॉटेलचे बिल देण्यावरून वाद निर्माण झाला या वादाचे रूपांतर हाणामारीत झाल्यानंतर बाजूलाच असलेल्या लाकडीत ढिल्पी उचलून महादेव गायकवाड यांच्या डोक्यात घालण्यात आली तर महादेव गायकवाड यांचा मुलगा आशुतोष गायकवाड हा देखील या मारहाणी मध्ये जखमी झाला होता दोघांनाही उपचारासाठी माजलगावच्या संजीवनी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते महादेव गायकवाड यांचा सोमवारी पहाटे दोनच्या सुमारास मृत्यू झाला या प्रकरणी आशुतोष गायकवाड यांच्या फिर्यादीवरून माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात रोहित हावरे व अन्य दोन अनोळखी तरुणाविरुद्ध गुन्हा नोंद झाला होता या घटनेत कृष्णा माणिकराव थावरे आणि ऋषिकेश रमेशराव थावरे यांचा सहभाग निश्चित करण्यात आला होता यावरून पोलिसांनी आज या तीनही आरोपींना पुण्यातील नगरपरिषद चौक आळंदी येथून ताब्यात घेतले आहे ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कौल सानेगुनीचे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने पोलीस आमदार भागवत शेलार महेश जोगदंड तुषार गायकवाड राजू पठाण बप्पासाहेब घोडके सुरवसे चाळक गणेश मराठे यांनी केली आहे.

**राजनंदीनी ट्रेडिंग कंपनी**

माध्यमातून वारंवार करण्यात आल्या यामुळे व तसेच शेतकऱ्यांन मधील रोष वाढला त्यामुळे राजनंदीनी ट्रेडिंग कंपनीचा गाशा गुंडाळला आहे परंतु शेतकऱ्यांनी आपली आर्थिक फसवणूक होऊ नये म्हणून राजनंदीनी ट्रेडिंग कंपनीकडे असलेली थकबाकी वसूल करण्यात यावी असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे कारण यापुढे राजनंदीनी ट्रेडिंग कंपनी सुरू होण्याची शक्यता नाही असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

**जनसुरक्षा विधेयकाला**

झाल्यास ते सगळे वापर होऊ शकतो म्हणून या विधायकाला विरोध करण्यासाठी लोकशाही बचाव समितीच्या वतीने राहुरी तहसील कार्यालयावर विविध राजकीय सामाजिक पक्ष संघटनेच्या वतीने भव्य विराट भारत बचाव जनं आक्रोश मोर्चाचे नियोजन करण्यात आले आहे.निवेदनावर प्रवीण लोखंडे अनिल जाधव यमुनाताई भालेराव दीपक साळवे नंदू भाऊ शिंदे भाऊसाहेब पगारे तानसेन बिवाल बाबासाहेब साळवे बाबा साठे अहमज पठाण आदींच्या सह्या आहेत

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**

हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# जागतिक वसुंधरा दिनानिमित्त व्याख्यानमालेचे १६वे पुष्प गुंफले



◆ ठाणे (प्रतिनिधी) :

जागतिक वसुंधरा दिनानिमित्त ठाणे महापालिकेने विचारमंथन व्याख्यानमालेअंतर्गत 'अक्षय ऊर्जा व संवर्धन' विषयावरील व्याख्यान कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानमालेचे १६वे पुष्प शरद पुस्तके यांनी गुंफले. या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त उमेश बिरारी, महापालिकेच्या मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान यांच्यासह महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी व ठाणे शहरातील नागरिक उपस्थित होते.

अक्षय म्हणजे न संपणारी ऊर्जा, शक्ति, वेळ. कमीतकमी ऊर्जा संसाधने वापरुन जास्तीतजास्त उत्पादन मिळविणे. आपल्या पर्यावरणाच्या संवर्धनाबरोबरच भविष्यातील ऊर्जा गरजांची पूर्तता करण्यासाठी आवश्यक असल्याचे शरद पुस्तके यांनी नमूद केले. औद्योगिक क्रांतीपासून कोळशाचा वापर हा मोठ्या प्रमाणावर होत असून वीजनिर्मिती, उद्योगधंदे, रेल्वेसाठी केला जातो. ग्रामीण व आदिवासी भागात स्वयंपाकासाठी लाकूड वापरले जाते. जंगलतोडीमुळे पर्यावरणावर त्याचा विपरित परिणाम होतो तसेच पारंपरिक ऊर्जा स्त्रोताचा साठा हा मर्यादित असून त्यामुळे प्रदूषण निर्माण हाते तसेच पर्यावरणाचा ऱ्हास देखील होत असल्याचे त्यांनी नमूद केले. शेती अवशेष, जनावरांचे शेण, घरगुती कचरा आदीपासून बायोगॅस व वीजनिर्मिती केली जाते. अपारंपारिक उर्जा स्त्रोतापासून निर्माण होणारी ऊर्जा ही अक्षय असून ती संपत नाही, त्याचे प्रदूषण होत नाही, दीर्घकाळीसाठी ती वापरली जात असल्याचे शरद पुस्तके यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी सौरउष्णतेवर आधारित विविध प्रक्रिया, घनकचरा, सांडपाण्यापासून वीजनिर्मितीचे महत्त्व पटवून दिले. व्याख्यानाच्या अखेरीस श्रोत्यांनी प्रश्न विचारले. जागतिक वसुंधरा दिनानिमित्त पर्यावरण व वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी 'पर्यावण वाचवा, वसुंधरा सजवा' या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करणारी चित्रफित उपस्थितांना दाखविण्यात आली. या उपक्रमाद्वारे पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकांनी जनजागृती करण्याचा निर्धार करावा असे आवाहन त्यांनी केले. राज्यभरात, २२ एप्रिल हा जागतिक वसुंधरा दिन आणि १ मे हा महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून या काळात वसुंधरा संवर्धनाचे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. 'आमचा ग्रह, आमची पृथ्वी' ही यंदाच्या वर्षीची संकल्पना आहे. त्या आनुषंगाने हे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्लॅस्टी प्रदुषण टाळण्यासाठी ठाणे महापालिका व रोटरी क्लबच्या माध्यमातून गांवदेवी परिसरात कापडी पिशव्यांचे सशुल्क व्हेंडिग मशीन उपलब्ध करण्यात आले असून नागरिकांनी याचा वापर करावा असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले. तसेच कार्यक्रमास उपस्थित असलेल्या नागरिकांना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

# ठाण्यात नालेसफाईच्या कामांना गती

## दुसऱ्या टप्प्यातील कामे २५ एप्रिलपासून सुरू होणार

◆ ठाणे (प्रतिनिधी) :

ठाणे महापालिका क्षेत्रातील पावसाळापूर्व नालेसफाईची दोन टप्प्यात कामे केली जाणार आहेत. त्यानुसार पहिल्या टप्प्यात पाच प्रभाग समिती क्षेत्रातील नालेसफाईची कामे सोमवारपासून सुरू झाली, तर दुसऱ्या टप्प्यातील कामे २५ एप्रिलपासून सुरू होणार आहेत.

ठाणे पालिका क्षेत्रातील नऊ प्रभाग समित्याअंतर्गत २७८ मीटर लांबीचे लहान-मोठे नाले आहेत. पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी पालिका दरवर्षी नालेसफाई करून घेते. त्यासाठी कोट्यवधींच्या निधीही खर्च केला जातो, मात्र काही वर्षांपासून ठेकेदारांना बिले वेळेत मिळत नसल्याने तसेच दंडात्मक कारवाईमुळे नालेसफाईच्या शर्यतीतून अनेक ठेकेदार बाहेर पडले आहेत. असे असले तरी पालिकेने नालेसफाईची कामे वेळेत सुरू करून मुदतीत संपवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सोमवारपासून पहिल्या टप्प्यातील नालेसफाईच्या कामाला सुरुवात झाली आहे. कापूरबावडी पोलीस ठाण्यालगत असलेल्या नाल्यांची आयुक्त सौरभ राव यांच्या उपस्थितीत सफाईला सुरुवात करण्यात आली. त्यानंतर हरदास नगर, रेल्वेमार्गालगत, ज्ञानसाधना महाविद्यालयाजवळ नाल्याच्या सफाईचे काम सुरू करण्यात आले. या वेळी माजी ज्येष्ठ नगरसेवक संजय भोईर, माजी नगरसेविका निशा पाटील, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त मनीष जोशी, दिनेश तायडे, उपनगर अभियंता सुधीर गायकवाड, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, सहाय्यक आयुक्त स्मिता सुर्वे, कार्यकारी अभियंता संजय कदम आदी उपस्थित होते.



कामांची विभागणी
पहिल्या टप्प्यात नौपाडा-कोपरी, उथळसर, माजिवडा-मानपाडा, दिवा आणि कळवा या पाच प्रभाग समिती क्षेत्रात नालेसफाईचे कार्यादेश दिले आहेत.
दुसऱ्या टप्प्यात, मुंब्रा, लोकमान्य नगर-सावरकर नगर, वर्तक नगर आणि वागळे इस्टेटमधील कामे केली जाणार आहेत.
दैनंदिन नोंदी ठेवण्याचे निर्देश
नालेसफाईचे वेळापत्रक काटेकोरपणे पाळताना झालेल्या कामाची माहिती रोज नोंदवण्यात येणार आहे. संबंधित अभियंता आणि स्वच्छता निरीक्षकांना त्याचा अहवाल करावा लागणार असून, काढलेल्या गाळाची दुर्गंधी पसरू नये, यासाठी तत्काळ उचलण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले आहेत.

# धार्मिक कार्याची नेमकी दक्षिणा किती ?

माणसाला केव्हा, कसे, आणि कोठे मरण येईल ते सांगता येत नाही. माणूस मरण पावल्यावर त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्याच्या निरनिराळ्या धर्माच्या निरनिराळ्या पद्धती आहेत. त्यात हिंदू धर्मात रूढ असलेली, सध्या प्रचलित असलेली दहनपद्धती ही सर्व जगात शास्त्रशुद्ध, विज्ञाननिष्ठ मानली जाते. बहुतेक धर्मात 'दफन' पद्धतच वापरली जाते. दहन किंवा दफन करण्यासाठी प्रत्येक गावात स्वतंत्र जागा असले. तिला स्मशानभूमी, मोक्षधाम अशी नावे आहेत. अंत्यसंस्काराच्या वेळी मृत व्यक्तीवर काही धार्मिक विधी केले जातात असे सांगतात की असे विधी करणारे ब्राह्मण वेगळे असतात आणि अन्य धार्मिक कार्ये करणारे वेगळे असतात. अंत्यविधी करणाऱ्या ब्राह्मणांना काही निम पाळावे लागतात. हे ब्राह्मण मृत व्यक्तीच्या नातलगांकडून काही दक्षणा घेतात.ही दक्षणा किती घ्यावी याला काही नियम नाही. यजमानांची आर्थिक स्थीती पाहून गुरुजी दक्षिणा सांगतात. हे कितपत योग्य आहे? यावर अलीकडे चर्चा सुरू आहे. नाशिकसारख्या तीर्थक्षेत्री मृत व्यक्तीवर धार्मिक विधी करून घेण्यासाठी बाहेर गावाहूनही भिविकलोक येत असतात. महाराष्ट्रात ज्या ठिकाणी नदी आहे तेथेही अशी कार्ये केली जातात.



विनायक बेटावदकर
कल्याण

हे विधी करण्यामागे ते करणाऱ्यांच्या धार्मिक भावना किती? किवा मृत व्यक्तीकडून पुढे आपल्याला- आपल्या कुटुंबाला काही त्रास होऊ नये अशी अंधश्रद्धेतून निर्माण झालेली भीती किती? हे समजणे कठीण असले तरी यातून भटजींचा चांगलाच व्यवसाय होतो. पूर्वी काही भटजी एक धार्मिक कार्य म्हणून ही कामे करीत, देतील ती दक्षिणा घेत , अलीकडे मात्र तो एक व्यवसाय झाल्याचे दिसते. अंत्यसंस्काराला तुम्ही बोलवा पण पुढची दहावे, बारावे, अशी कार्येही आम्हालाच दिली पाहिजेत, अशी अट घातली जाते आणि या सर्वांची मिळून एकत्र रक्कम सांगितली जाते. काही तीर्थक्षेत्री, तर मृत व्यक्तीच्या प्रथम कार्यापासून सर्व कार्ये करणाऱ्या ब्राह्मणांचे गट असतात. स्थानिक ब्राह्मण संघटना अशी कामे करणाऱ्याना कामे वाटून देतात. त्यामुळे आपसात होणारे वाद टाळण्यास मदत होते. काही ठिकाणी ऐनवेळी भटजी मिळत नाही तेव्हा भडाग्नी देऊन काम उरकले जाते. नंतर भटजीकडून सर्व विधी व्यवस्थित करून घेतले जातात. अलीकडे पौरोहित्य करणारे किवा अंत्यविधीच्या वेळचे कार्य करणारे भटजी कमी राहिले आहेत. त्यांची अनेक कारणे आहेत एकतर केवळ पौरोहित्यावर घर चालवणे कठीण झाले. काही कारणामुळे लोकांमधली धार्मिक भावना कमी झाली. कधी कधी तर ब्राह्मण भोजनासाठी ब्राह्मण मिळत नाही. अशा या सर्व परिस्थितीत आज जे ब्राह्मण आहेत त्यातील काही दक्षिणेसाठी अडून बसतात. आपणा सांगितलेली दक्षिणा यजमानांना परवडते का? असा विचार करीत नाही. यातून आज अनेक प्रश्न निर्माण झाले तर आहेतच पौरोहित्यावरचा, धर्मावरचा यजमानांचा विश्वासही कमी झाल्याचे दिसून येत आहे. हे सर्व लक्षात घेऊन ब्राह्मण संघटनांनी आता पुढाकार घेऊन घरातील धार्मिक कार्ये म्हणजे गणपती स्थापना, गौरी, गृहशांती ग्रहशांती, शुभकार्ये सणानिमित्त करावे लागणारे पूजा पाठ. यांचे दर निश्चित करावेत. त्याचप्रमाणे स्मशानात प्रेताला अग्नी देणे, त्यांचे पुढील कार्ये यांचेही दर ठरवून ते संघटनांनी ठळकपणे धार्मिक ठिकाणी लावावेत. कोणती कार्ये कोणी करावीत हे ठरवून घ्यावे, पौरोहित्य संघटनातील कार्यकर्त्यांची नावे, पत्ते, सर्वांना समजतील अशा ठिकाणी लावावेत, सर्वांनी आठ-पंधरा दिवसांनी एकत्र जमून निरनिराळ्या धार्मिक विषयांवर चर्चा घडवून आणाव्यात त्यामुळे आज पौरोहित्य करणारांची कमी होणारी संख्या थोपवणे शक्य होईल लोकांनाही आपणास निश्चित ठिकाणी भटजी मिळेल असा विश्वास राहून आज धार्मिक भावनांबद्दल जी ग्लानी आल्यासारखी स्थीती निर्माण झाली आहे तिला आळा बसू शकेल. कोणत्या कामाला किती खर्च येईल तेही लोकांना समजून आपले 'बजेट' बनवता येतील.

# सहा महिन्यातच रस्त्यावरील चेंबर्सची झाकणे तुटली

## नागरिकांना मनस्ताप ; अपघाताला आमंत्रण

◆ डोंबिवली (वार्ताहर):

डोंबिवली एमआयडीसी निवासी मधील वंदेमातरम उद्यानसमोर सर्व्हिस रोडवरील पाण्याच्या पाईपलाईनवरील चेंबर्सची झाकणे तुटली असून त्यात एखाद्या वाहनाचा अपघात होऊन दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. मात्र एमआयडीसीला त्याचे काही सोयरसुतक नाही असे दिसत असल्याची नाराजी नागरिकांनी व्यक्त केली आहे.

सर्व्हिसरोड हा सात महिन्यापूर्वी एमआयडीसीकडून बांधण्यात आला. ठेकेदाराने सदर रस्ता बनवल्यानंतर येथील रस्त्याच्याकडेला मेन पाण्याच्या पाईपलाईनवर जेथे इमारतींसाठी नळ जोडणी होते तेथे चेंबर्स बनवली होती. ही चेंबर्स तकलादू असल्याने वाहने जावून सहा महिन्यातच तुटली आहेत. एखादे वाहनाचे चाक त्यात फसून दुर्घटना होऊ शकते. याच रोडवर सद्या वाहतुकीचे प्रमाण वाढले असून कल्याण शिळ रोडवरील मेट्रो कामामुळे ट्रॅफिक जाम असल्याने बरीच वाहने या सर्व्हीस रोडचा उपयोग करतात. याबद्दल एमआयडीसीला येथील रहिवासी मुकुंद साबळे यांनी कळवले आहे. कल्याण डोंबिवली महापालिकेच्या क्षेत्रात अनेक ठिकाणी गटारे व पदपथची कामे पूर्ण करायची आहेत. सिमेंटची झाकणे अनेक ठिकाणी तुटली असून महापालिकडे तक्रारी केल्यानंतर नोंद घेऊन बदलली जातात, मात्र झाकणाचा दर्जा तपासला जातो की नाही याची नागरिकांच्या मनात शंका आहे. समाजसेवक राजू नलावडे यांनी बोलताना सांगितले.



## भाजपाकडून ५ नव्या मंडल अध्यक्षांची नियुक्ती



**कल्याण :** संघटन पर्व अभियानांतर्गत भारतीय जनता पक्षाने महाराष्ट्रात एकाच वेळी तब्बल १ हजार २०० हून अधिक मंडल अध्यक्षांच्या नियुक्त्या पूर्ण केल्या आहेत. त्यापैकी कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघातही ५ नव्या मंडल अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वाखाली आणि कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली नियुक्त करण्यात आलेल्या या मंडल अध्यक्षांमुळे भाजपाची ताकद आणखी वाढण्यासह पक्ष संघटनाही आणखी मजबूत झाल्याचा विश्वास माजी आमदार नरेंद्र पवार यांनी व्यक्त केला आहे. जुने कल्याण शहर मंडल अध्यक्षपदी अमित धाक्रस, नवीन स्वप्निल काटे, मध्य रितेश फडके, टिटवाळा मंडल अध्यक्षपदी शक्तिवान भोईर आणि मोहने मंडल अध्यक्षपदी नवनाथ पाटील अशा युवा पदाधिकाऱ्यांच्या खांद्यावर पक्षाने जबाबदारी सोपवली आहे.

# शहापूर तालुक्यात तीव्र पाणीटंचाई

◆ शहापूर (वार्ताहर):

शहापूर तालुक्यात पाणीटंचाईने जनजीवन विस्कळीत झाले आहे. या टंचाईवर मात करण्यासाठी सध्या साप गावजवळील भातसा नदीचे पाणी एकमेव उपाय ठरत आहे. संपूर्ण तालुक्यातील पाण्याचा पुरवठा हा टँकरद्वारे केला जात आहे. टँकर चालकांना लांब पल्ल्याचा प्रवास करावा लागत असून अनेक दुर्गम भागांमध्ये पुरवठ्याच्या फेऱ्या अपुऱ्या पडत आहेत.

'धरणांचा तालुका' म्हणून ओळख असलेल्या शहापुरात सद्यस्थितीत २७ गावे, १०८ पाड्यांतील १३५ गावपाड्यांना रोज ३७ टँकरच्या साहाय्याने पाणीपुरवठा केला जातो. भातसा नदीखेरीज अन्य जलस्रोत कोरडे पडल्यामुळे, हा एकमेव स्रोत अपुरा पडत आहे. घाटमाथ्यावरील रस्त्यांवर टँकर नेण्यास अडथळे येतात. डोळखांब, खराडे, बेहळोली, मुसई, जांभे, आदिवली आदी सहा लघु धरणांमध्ये गाळ साचल्यामुळे त्यांची जलसाठवण क्षमता घटली आहे. धरणांनी तळ गाठले असून, पाणी वापरण्यास योग्य राहिलेले नाही. भविष्यात या धरणांची उंची वाढविण्याची गरज आहे. तसे झाले, तर भातसावरचा ताण कमी होईल तालुक्यात जलजीवन मिशन अंतर्गत १९७ पाणी योजना मंजूर झाल्या असल्या, तरी अनेक योजना अद्यापही अपूर्ण आहेत. पाइपलाइन आणि टाक्या बांधण्यासाठी जागांची निश्चिती नाही. २००४ सालपासून सुरू असलेल्या 'भारत निर्माण', 'राष्ट्रीय पेयजल', 'जल स्वराज्य 'सारख्या २०० हून अधिक योजना रखडल्या आहेत. शहापूरच्या नागरिकांना रोजच्या गरजेपुरते पाणी मिळविण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे पाणी टंचाईवर मात करण्यासाठी अपूर्ण योजनांची तातडीने पूर्तता करणे गरजेचे बनले आहे.



## वेचक

### महात्मा गांधी विद्यामंदिर शाळेत विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी

**कल्याण :** विद्यार्थी, पालक, शिक्षक यांच्या डोळ्यांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी , दृष्टी है तो सृष्टी है! या उक्तीप्रमाणे डोळ्यांचे महत्त्व व त्याचे आरोग्य यासाठी नेत्र तपासणी कॅम्पचे आयोजन डोंबिवली पश्चिमेतील महात्मा गांधी विद्यामंदिर शाळेत मुख्याध्यापक अजयकुमार जोगी यांच्या संकल्पनेतून सोमवारी करण्यात आले होते. डॉ. अगरवाल आय हॉस्पिटल घरडा सर्कल डोंबिवली (पूर्व) यांच्या तर्फे शिशु बालवर्ग ते इ. चौथी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांची व पालकांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. हॉस्पिटलचे प्रतिनिधी दीपक कोल्हे, नुजहा मोमीन व नेहल आवटे यांच्या मार्गदर्शनाखाली नेत्र तपासणी करण्यात आली. त्यावेळी उद्घाटनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार कुणाल म्हात्रे यांच्या हस्ते या नेत्र तपासणी शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. कुणाल म्हात्रे यांनी आपल्या डोळ्यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. मोबाईलचा वापर कमी करा डोळ्यांची काळजी घ्या असे आवाहन करताना त्यांनी मराठी शाळेविषयी त्यांचे प्रेम व्यक्त केले.



### 'मुलांना खेळासाठी मैदाने उपलब्ध व्हावी'



(छाया : अशोक घाग)

**ठाणे :** ठाणेसारख्या नौपाडा विभाग हा अतिशय दाटीवाटीने गजबजलेला परिसरात गावदेवी मैदान, घंटाळी मैदान, भगवती मैदानांसारखी मोठी मैदान आहेत. परंतु ऐन उन्हाळी सुट्टीत सातत्याने सातत्याने भरविण्यात येणाऱ्या व्यावसायिक प्रदर्शनामुळे स्थानिक मुलांना खेळायला मैदान शिल्लक राहिले नसल्यामुळे नगरसेवक सुनेश जोशी नगरसेविका मृणाल पेंडसे यांनी महापालिकेच्या प्रवेशद्वारावर स्थानिक मुलांना घेऊन क्रिकेट खेळून अनोख्या पद्धतीने आंदोलन केले. यावेळी खेळायच्या मैदानापासून वंचित असलेल्या सामान्य मुलांनी '''आम्हाला उद्योजकांच्या श्रीमंत मुलांसारखे टर्फ मैदानावर तासाला ३०० रुपये देऊन खेळायला शक्य नाही. आताच कोरोना महामारी नंतर कुठे आर्थिक घडी बसत आहे . विरंगुळा म्हणून सुट्टीच्या दिवशी क्रिकेट, फुटबॉल खेळायला गावदेवी मैदान उपलब्ध नसल्याची खंत व्यक्त केली.

# मुलुंडमध्ये मॉक फायर ड्रिल

◆ मुलुंड (वार्ताहर) :

अग्निशमन सेवा सप्ताहानिमित्त मुंबई अग्निशमन दलाच्या सहकार्याने मुलुंड येथील फोर्टिस रुग्णालयामध्ये मॉक फायर आणि रेस्क्यू ड्रिल आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमामागचा मुख्य उद्देश रुग्णालयामधील अग्निसुरक्षा वाढवणे तसेच आपत्कालीन परिस्थितीत त्वरित आणि प्रभावी प्रतिसाद देण्यासाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करणे हा होता.

या ड्रिलमध्ये सुमारे ३०० हून अधिक रुग्ण, त्यांचे नातेवाईक, रुग्णालयाचे कर्मचारी उपस्थित होते. त्यांना प्रत्यक्ष बचावकार्याची प्रात्यक्षिके दाखवण्यात आली. तसेच आपत्कालीन प्रक्रियेबाबत माहितीही जी. मुंढे, एस. एस. कुडतरकर, सहाय्यक विभागीय अग्निशमन अधिकारी डी. एम. पाटील यांनी केले. त्यांच्या देखरेखीखाली ७० पेक्षा अधिक अग्निशमन कर्मचाऱ्यांनी अत्याधुनिक उपकरणांच्या सहाय्याने बचाव कारवाईचे प्रात्यक्षिक सादर केले. फोर्टिस रुग्णालयाचे बिझनेस हेड डॉ. एस. नारायणी, फॅसिलिटी डायरेक्टर डॉ. विशाल बेरी यांनी सर्व अग्निशमन अधिकाऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर जाहीर केले.



## किसळ-पारगावची महिला सभा झळकणार बीबीसी चॅनेलवर

**मुरबाड :** मुरबाड तालुक्यातील ग्रामपंचायत किसळ-पारगावच्या सरपंच डॉ. कविता वरे-भालके निवडून आल्यापासून महिला सक्षमीकरण व महिला नेतृत्त्व विकास यावर काम करत आहेत, याच कामाची पोचपावती म्हणून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करण्याची संधी प्राप्त झाली. महिला सभा व मासिक महोत्सव असा अनोखा उपक्रम राबविण्यात आल्याने ग्रामपंचायत किसळ-पारगावची मान उंचावली आहे, याचीच परिणीती म्हणून बीबीसी या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या न्यूझ चॅनेलला ग्रामपंचायत किसळ-पारगावच्या महिला सभेला चित्रित करायचे आहे.

# मीटर कॅलिब्रेशनसाठी रिक्षाचालकांची उदासीनता

## ५० टक्केच रिक्षांनी केले मीटर कॅलिब्रेशन ; ३० एप्रिल कॅलिब्रेशनसाठी अंतिम मुदत

◆ ठाणे (प्रतिनिधी):

रिक्षा मीटर दरवाढीनंतर अडीच महिने उलटले असले तरी, ठाण्यातील केवळ ५० टक्क्यांहून थोड्या अधिक रिक्षाचालकांनीच मीटर कॅलिब्रेशन पूर्ण केले. ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे नोंदणीकृत सुमारे ८० हजार रिक्षांपैकी फक्त ४०,७०० रिक्षांनी कॅलिब्रेशन केल्याचे समोर आले आहे. उर्वरित रिक्षांवर कारवाई होण्याची शक्यता असून, ३० एप्रिल ही अंतिम मुदत आहे.

रिक्षाभाडे वाढवून मिळावे यासाठी गेल्या काही महिन्यांपासून रिक्षा संघटना मागणी करत होत्या. त्यानुसार २३ जानेवारी २०२५ रोजी मुंबई महानगर प्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांच्या बैठकीत रिक्षा भाडेवाढबाबत निर्णय झाला. १ फेब्रुवारी नंतर हे दर लागू झाल्यावर मीटरच्या टॅरिफमध्ये बदल होणे आवश्यक आहे. बहुतांशी रिक्षांच्या इलेक्ट्रॉनिक मीटरवर किमान भाडे २३ रुपये दर्शवले जाते. मात्र दर वाढीबाबत अनेकजण अनभिज्ञ आहेत. त्यामुळे रिक्षाचे भाडे देताना भांडण होते. त्यामुळे ३० एप्रिलपर्यंत टॅरिफमध्य बदल करणे आवश्यक माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी रोहित काटकर यांनी दिली. ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे १८ रिक्षा मीटर दुरुस्ती केंद्रांची नोंद आहे तर ठाणे, मीरा भाईंदर ऐरोली या तीन ठिकाणी मीटर कॅलिब्रेशन केले जाते. अधिकृत नोंदणीनुसार ८० हजाराहून अधिकृत रिक्षा धावत आहेत. अर्ध्याहून अधिक रिक्षांनी मीटर कॅलिब्रेशन केलेले नाही, मात्र ३० एप्रिलपर्यंत केले नाही दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला जाऊ शकतो.



> रिक्षातून महिनाभरातून केव्हातरी प्रवास होतो. मीटर रीडिंगप्रमाणे भाडे देतो. पण मीटरवर एक आणि रिक्षाचालक भाडे वेगळेच सांगतो. रिक्षा चलक काहीही भाडं सांगेल म्हणून आम्ही द्यायचं का?
> **- संजय पाटील,** ठाणे

> रिक्षांच्या मीटर कॅलिब्रेशन करण्यासाठी अवघे काही दिवस बाकी आहेत. मीटर कॅलिब्रेशन करताना मीटर दुरुस्ती, मीटर अपग्रेड शासकीय पडताळणी शुल्क धरून रु. ७०० शुल्क आकारला जातो. त्यानुसार शुल्क द्यावे.
> **- रोहित काटकर**
> ( उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे)

# 'स्वरप्रभात'मध्ये पंडित सुरेश बापट यांचे गायन

◆ ठाणे (प्रतिनिधी):

ठाण्यातली 'गुरुकुल प्रतिष्ठान' ही अभिजात संगीतात विविध उपक्रम राबविणारी एक अग्रगणी संस्था आहे. एक दशकाहून अधिक काळ या संस्थेतर्फे बासरी वादन करणारे अनेक विद्यार्थी तयार होऊन आपल्या कलेचा ठसा उमटवत आहेत. सुविख्यात बासरीवादक पंडित विवेक सोनार यांच्या प्रयत्नांतून संस्थेतर्फे नावीन्यपूर्ण उपक्रम होत असतात.

गुरुकुल प्रतिष्ठानतर्फे 'स्वरप्रभात' या कार्यक्रमाचे दुसरे पुष्प रविवारी २७ एप्रिल २०२५ रोजी, आम्फिथिएटर, टाऊन हॉल, ठाणे येथे सादर होणार आहे. या कार्यक्रमाला युनियन बँक आणि लाईट बुक रिटेल प्रायव्हेट लिमिटेडचे विशेष सहकार्य लाभले आहे. सदर कार्यक्रमात ठाण्यातील ज्येष्ठ गायक पंडित सुरेश बापट यांचे शास्त्रीय गायन होणार असून त्यांना आत जोशी हार्मोनियम आणि सुहास चितळे तबल्यार साथ करणार आहेत. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पं. विवेक सोनार यांचे गुणवंत शिष्य समूह बासरी वादन करतील. स्वरप्रभात या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून जगविख्यात बासरी पंडित हरिप्रसाद चौरसिया उपस्थित राहणार असून ते रसिकां सोबत संवाद देखील साधणार आहेत. त्यांच्या हस्ते पंडित हरिप्रसाद चौरसिया संगीत शिष्यवृत्ती भारतातील निवडक गुणी विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. सदर कार्यक्रम रसिकांना विनामूल्य प्रवेश आहे.



परिवहन सेवेच्या अपुऱ्या सुविधांमुळे नागरिक खासगी वाहनाने स्थानक

# ठाणे जिल्ह्यात अडीच वर्षांत साडेपाच लाख वाहनांचा भार

◆ ठाणे (प्रतिनिधी):

ठाणे जिल्ह्यात विशेषतः ठाणे, डोंबिवली, कल्याण, भिवंडी यासारख्या शहरात अरुंद रस्ते, विविध प्रकल्पांची कामे, अपुऱ्या पायाभूत सुविधा यामुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक हैराण झाले आहेत. असे असतानाच, दुसरीकडे संपूर्ण जिल्ह्यात मागील अडीच वर्षांत तब्बल साडेपाच लाख नव्या वाहनांची नोंद झाल्याचे परिवहन विभागाच्या आकडेवारीतून समोर येत आहे. सर्वाधिक वाहनांची नोंद ठाणे विभागात झाली आहे. विशेष म्हणजे, दरवर्षी वाहनांच्या संख्येत सातत्याने वाढ होत असल्याचे चित्र आहे.



शहरात लोकसंख्या वाढल्याने त्याचा परिणाम रेल्वे वाहतुकीवरही बसत आहेत. परिवहन सेवेच्या अपुऱ्या सुविधा यामुळे नागरिक खासगी वाहनाने स्थानक गाठतात. त्यामुळे स्थानकांमध्येही गर्दी होत असते. तर, रेल्वेची गर्दी टाळण्यासाठी काही नोकरदार खासगी वाहनाने मुंबईला जाण्यास पंसती देत असतात. हलक्या वाहनांची वाहतूक त्यासोबतच गुजरात, भिवंडी, उरण मार्गावर सुरू असलेली अवजड वाहनांची वाहतूक देखील सुरू असते. त्यामुळे वाहन चालकांना दररोज कोंडीचा फटका सहन करावा लागत असतो; परंतु मागील सुमारे अडीच वर्षांच्या कालावधीत म्हणजेच, १ जानेवारी २०२३ ते २० एप्रिल २०२५ या कालावधीत ठाणे जिल्ह्यात पाच लाख ७३ हजार ५५९ वाहनांची नोंद झाली. परिवहन विभागाच्या आकडेवारीतून ही माहिती समोर आली आहे. सर्वाधिक वाहनांची नोंदणी ठाणे उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या क्षेत्रात झाली. ठाणे उप प्रादेशिक परिवहन विभागात ठाणे, भिवंडी शहर आणि ग्रामीण पट्टा येतो. कल्याण उपप्रादेशिक परिवहन विभागात डोंबिवली ते बदलापूर आणि ग्रामीण क्षेत्राचा सामावेश आहे. तर वाशी उपप्रादेशिक परिवहन विभाग क्षेत्रात नवी मुंबई शहराचा सामावेश आहे. ठाणे उपप्रादेशिक परिवहन विभागात दोन लाख ८० हजार ८०१, कल्याण उप प्रादेशिक परिवहन विभागात एक लाख ९८ हजार ५२ आणि वाशी उपप्रादेशिक परिवहन विभागात ९४ हजार ७०६ नव्या वाहनांची नोंदणी झाली आहे.

> सार्वजनिक वाहतूक सुविधांचा वापर अधिक वाढल्यास व्यक्तीला मानसिक ताण देखील कमी होईल तसेच इंधन खर्च देखील बचत होईल. खासगी कंपनीच्या कार्यालयांनीही त्यांच्या वेळांमध्ये बदल केल्यास रस्त्यावरील होणाऱ्या वाहनांचा ताण कमी होईल.
> **- डॉ. शंकर विश्वनाथ,** वाहतूक तज्ज्ञ.

**वार्षिक आकडेवारी**
१ जानेवारी ते २० एप्रिल २०२५
ठाणे – ४१,३३९
कल्याण – २९,३७४
वाशी – १३,९३३

## जन सुरक्षा विधेयकाच्या निषेधार्थ मोर्चा

◆ वासिंद (वार्ताहर) :

भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) या संघटनेच्या वतीने शहापूर तहसिल कार्यालयावर मोर्चा काढून जन सुरक्षा विधेयकाचा तीव्र निषेध करून हे विधेयक रद्द करण्याची मागणी केली. सदरचा मोर्चा रखरखत्या उन्हात निघाला होता.

बस स्थानकातून सुरू झालेला हा मोर्चा तहसील कार्यालयावर पोहचून यामध्ये सहभागी शेकडो कार्यकर्ते, पदाधिकारी यांनी या विधेयकाला विरोध दर्शवून निषेध करीत रद्द करण्याचे मागणीचे निवेदन नायब तहसीलदार व्ही. आर. चौधरी यांच्याकडे दिले. या मोर्चावेळी माकप जिल्हा सचिव मंडळ सदस्य व तालुका सचिव कॉ.कृष्णा भवर, एसएफआय जिल्हा अध्यक्ष कॉ.भास्कर म्हसे, सिटु राज्य कमिटी सदस्य व तालुका अध्यक्ष कॉ. विजय विशे, माकपचे सोनू वाघ, नंदू खांजोडे, रामदास कोदे, अशोक विशे, मनोज काकवा, मनीष फोडसे, आनंद रोज, बंडू खर्डीकर, अनु अंधेर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी सहभाग घेत मोर्चाला संबोधित केले.



दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी

# पुनरावृत्ती होणारे लघवीचे संसर्ग

लघवीचा संसर्ग (Urinary Tract Infection - UTI) हा महिलांमध्ये अतिशय सामान्यपणे आढळणारा आजार आहे; परंतु जेव्हा हे संसर्ग वारंवार होत राहतात, तेव्हा ते केवळ त्रासदायकच नव्हे तर आरोग्याच्या दृष्टीनेही चिंताजनक ठरतात.

**लघवीच्या संसर्गाची कारणे**

महिलांमध्ये लघवीच्या संक्रमणाचे प्रमाण पुरुषांपेक्षा जास्त असते. याचे प्रमुख कारण म्हणजे महिलांची लघवीची नळी (urethra) लहान असते व योनीच्या अत्यंत जवळ असते. त्यामुळे जंतू सहजपणे मूत्रमार्गातून मूत्राशयात पोहोचतात. याखेरीज, काही विशिष्ट परिस्थितींमध्ये या संसर्गाची पुनरावृत्ती होते:

१. जैविक कारणे : युरेथ्रा लहान असणे, योनी व गुदद्वार यांच्यातील अल्प अंतर.

२. स्वच्छतेचा अभाव : चुकीच्या पद्धतीने स्वच्छता करणे, विशेषतः मागून पुढे पुसणे.

३. संभोगाशी संबंधित कारणे : लैंगिक संबंधांनंतर लगेच लघवी न करणे किंवा योग्य स्वच्छता न ठेवणे.

४. हार्मोन्समधील बदल: विशेषतः रजोनिवृत्ती (menopause) नंतर एस्ट्रोजेनच्या पातळीत घट झाल्याने योनीतील सूक्ष्मजीवसंतुलन बिघडते व संसर्ग होण्याची शक्यता वाढते.

५. मधुमेह : साखरेचे प्रमाण वाढल्याने संसर्गाची शक्यता वाढते.



स्त्री आरोग्य
डॉ. स्नेहल पाटील

६. मूत्राशय पूर्णपणे रिकामे न होणे : गर्भाशयाच्या वाढलेल्या आकारामुळे किंवा काही वेळा गर्भाशयातील गाठींमुळे मूत्राशयावर दाब येतो व लघवी पूर्णपणे बाहेर पडत नाही.

## लक्षणे

- लघवीच्या संसर्गाची लक्षणेही तीव्र असतातः
- सतत लघवी लागणे; परंतु थोडीथोडीच लघवी होणे
- लघवी करताना जळजळ किंवा वेदना
- लघवीला दुर्गंधी येणे
- ताप, थंडी व अंगदुखी (संक्रमण वरच्या भागात गेल्यास)
- पाठीच्या खालच्या भागात वेदना

## निदान व तपासण्या

एका स्त्रीरोगतज्ज्ञासाठी याचे अचूक निदान करणे महत्त्वाचे असते. सर्वप्रथम रुग्णाचा सविस्तर इतिहास विचारणे – संसर्गाची वारंवारिता, लैंगिक सवयी, स्वच्छतेची पद्धत, मधुमेहासारखे आजार इत्यादींचा अभ्यास केला जातो.

नंतर खालील तपासण्या केल्या जातात :

लघवीची सामान्य तपासणी (urine routine and microscopy)

लघवी culture तपासणी (urine culture and sensitivity): यात संसर्ग करणारा विशिष्ट जंतू ओळखता येतो.



अल्ट्रासोनोग्राफी : मूत्रमार्गात कोणती अडचण आहे का हे पाहण्यासाठी.

ब्लड शुगर तपासणी : मधुमेह आहे का हे तपासण्यासाठी.

## उपचार

१. प्रतिजैविके (Antibiotics): लघवीच्या रिपोर्टनुसार योग्य अँटिबायोटिक देणे.

२. साधे नियम : भरपूर पाणी पिणे, लघवी रोखून न ठेवणे, लैंगिक संबंधानंतर लघवी करणे.

३. हार्मोन थेरपी (post-menopausal women) : योनीतील एस्ट्रोजेन क्रीम वापरणे उपयुक्त ठरते.

४. स्वच्छतेबाबत मार्गदर्शन : योग्य पद्धतीने स्वच्छता राखणे, विशेषतः मासिक पाळी दरम्यान व लैंगिक संबंधानंतर.

५. दीर्घकालीन प्रतिजैविके : काही स्त्रियांना रोज रात्री कमी मात्रेतील प्रतिजैविके काही महिन्यांसाठी दिली जातात.

६. दैनंदिन सवयींमध्ये बदल : टाईट कपडे आणि सिंथेटिक अंडरवेअर टाळा, त्याऐवजी सूती कपडे वापरा. गरज नसताना पॅड्स किंवा पँटी लाईनर्स वापरणे टाळा. लघवी रोखून ठेवू नका. वेळेवर लघवी करा. साबणाचा अति वापर न करणे.

## प्रतिबंधात्मक उपाय

- स्त्रीरोगतज्ज्ञ म्हणून आम्ही रुग्णांना काही साध्या सवयी अंगीकारण्याचा सल्ला देतो.
- दररोज किमान ८-१० ग्लास पाणी पिणे
- लैंगिक संबंधानंतर स्वच्छता ठेवणे
- कधीही मागून पुढे पुसू नये, नेहमी पुढून मागे पुसावे
- पाळीच्या काळात नॅपकिन वेळेवर बदलणे
- मधुमेह नियंत्रणात ठेवणे

## निष्कर्ष

लघवीचे संसर्ग हे केवळ एका सामान्य त्रासापेक्षा अधिक गंभीर बाब ठरू शकतात. स्त्रियांनी याकडे दुर्लक्ष न करता तज्ज्ञ सल्ला घ्यावा. स्त्रीरोगतज्ज्ञाच्या दृष्टिकोनातून, योग्य उपचार, स्वच्छता आणि जागरूकता यामुळे हे संसर्ग टाळता येतात.

drsnehalspatil@gmail.com

# प्रयोगशीलतेतून विद्यार्थ्यांना घडवणाऱ्या 'सुमितादाई दिघे'



कर्तृत्ववान ती राज्ञी

सगळ्यांना सस्नेह नमस्कार. कर्तुत्वान ती राज्ञी या लेखमालेतून आपण दर बुधवारी प्रेरणादायी महिलांच्या कार्याबद्दल जाणून घेत आहोत. या सगळ्या प्रवासात तुमच्या सगळ्यांसोबत मला स्वतःला देखील अधिकच समृद्ध होत असल्याचे जाणवत आहे.

आज आपण धाडस आणि साहस हे अंगभूत गुण असणाऱ्या, अभ्यासक्रमाव्यतिरिक्त मुलांमधील सुप्त कलागुण ओळखून, प्रयोगशीलतेने त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणाऱ्या माननीय सुमिताताई दिघे यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल जाणून घेणार आहोत. जिद्द ,ज्ञान आणि साहस या त्रिसूत्रीचा अवलंब करून गेली तीस वर्ष विद्यार्थ्यांसाठी अखंड कार्यरत असणाऱ्या जिज्ञासा संस्थेच्या, विद्यार्थ्यांच्या लाडक्या दिघे मॅडम.



वैशाली गायकवाड

आई-वडिलांच्या कडक शिस्तीत वाढलेल्या सुमितााईंना लहानपणापासूनच नेतृत्वगुणांची, संवाद कौशल्याची शिदोरी उत्तमरीत्या लाभली. मुलुंड कॉलेज ऑफ कॉमर्समधून बी कॉम आणि नंतर युनियन बँक ऑफ इंडियामध्ये नोकरी करतानाच सिडनहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स चर्चगेट येथून सुमिताताईंनी एम कॉम केले, कॉलेजमध्ये असताना मुंबई विद्यापीठातर्फे बेसिक माउंटेनअरिंग कोर्ससाठी त्यांची निवड झाली. हिमाचल प्रदेशातील अटल बिहारी वाजपेयी इन्स्टिट्यूट ऑफ माउंटेनिअरिंग आणि अलाईड स्पोर्ट्स मनाली येथील बेसिक कोर्समध्ये ए ग्रेड मिळवून स्वतःची उत्कृष्टता सिद्ध केली. त्यानंतर अधिक उंचीवर व बर्फाच्छादित शिखरांवर जाऊन त्यांनी उत्तर प्रदेशातील उत्तर काशी येथून नेहरू इन्स्टिट्यूट ऑफ माउंटेनिअरिंगचा ॲडव्हान्स कोर्स पूर्ण केला प्रत्येक कोर्सला एक शिखर अशी एक्सप्डीशन केली.

लग्नानंतर सासरच्या व पतिराजांच्या भक्कम पाठिंब्यामुळे सुमिताताईंच्या गिर्यारोहणाच्या आवडीने अजूनच उंच भरारी घेतली. सुरुवातीला काही काळ दिघे सरांनी स्वतःचा व्यवसाय सुरू करून तो सांभाळला, पण कालांतराने दोघांनीही एकाच ध्येयाने काम करण्याचे ठरविले.

युनियन बँकेतील ऑफिसर पदाची नोकरी सांभाळून त्या स्वतः गिर्यारोहण संदर्भातील प्रशिक्षण घेत होत्या. व त्यासाठी बँकेतूनही त्यांना प्रोत्साहन मिळत होते . त्यांच्या मुलीच्या "सतलज" च्या जन्मानंतर काही वर्षांनी त्यांनी बँकेतील नोकरी सोड. जिज्ञासा संस्थेचे वैशिष्ट्य म्हणजे संस्थेमार्फत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना शास्त्रशुद्ध पद्धतीने मनाली येथे ॲडव्हेंचर कोर्स, स्नोस्किइंग कोर्स प्रशिक्षित निर्देशकांच्या मार्गदर्शनाखाली शिकवले जातात. त्यांच्या राहण्याची जेवणाची आरोग्याची उत्तम काळजी तिथे घेतली जाते.

वृत्तपत्र, नियतकालिक कशी चालवली जातात हे समजून घेणं म्हणजेच मुलांच्या आकलन शक्तीला चालना देण. हेच ध्येय समोर ठेवून जिज्ञासा संस्थेतर्फे मुलांच्या भाव विश्वातले मुलांनी मुलांसाठी मुलांचे असे आगळे वेगळे त्रैमासिक प्रकाशित केले. त्याकरिता ठाणे परिसरातल्या शाळांच्या मुख्याध्यापकांशी सल्लामसलत करून, जवळजवळ तीन महिने दहा ते बारा मुले, जिज्ञासाचे कार्यकर्ते मा दिनकर गांगल सर व इतर समिती सदस्य यांनी मिळून त्रैमासिक तयार केले. हा सगळा कार्यभार स्वतःच्या घरूनच राबविला. त्याचीच पोचपावती म्हणून "शालेय जिज्ञासा" हे मुलांनी मुलांसाठी संपादित केलेले दीपावली ९३चे भारतातील अशा स्वरूपाचे पहिलेच त्रैमासिक ठरले. २०१६ पर्यंत अविरत चालू राहिले.

पर्यावरणासोबत मुलांचे नाते जोडायचे असेल तर त्यांच्यातले अंगभूत गुण खूप उपयोगात येतात. एकमेकांमधील सहकार्याची भावना वाढते, संवाद कौशल्य विकसित होते, तसेच आकस्मिक येणाऱ्या अडीअडचणींवर मात करण्यासाठी धाडस मिळते, याच गुणांना प्रांगण मिळवून देत साहस शिबीर सुरू केले. हिमालयातील मनाली येथे शिबीर, मेजर गावंड यांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी सैनिक शिक्षण वर्ग ठाण्यातील तज्ज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली विज्ञान मंच व निसर्ग शिबीर, साहित्य शिबीर, कला शिबीर आयोजित केली. या शिबिरातील मुलांच्या पूर्वतयारी पासून ते शिबिरे पार पडेपर्यंत दिघे मॅडम या सर्व मुलांची कधी आई, कधी मावशी, कधी मित्र-मैत्रिणी बनून त्यांची काळजी घेतात. त्यांच्यासाठी प्रसंगी जेवण पण तयार करतात. सह्याद्रीतील दुर्गभ्रमंती, पावसाळी ट्रेकिंग अशा विविध उपक्रमांमधून हजारांहून अधिक विद्यार्थी आतापर्यंत सहभागी झाले आहेत.

जिज्ञासा संस्थेतर्फे पर्यावरणपूरक उपक्रम राबवताना, संपूर्ण ठाणे शहरातील तलावांच्या स्वच्छता मोहिमेमध्ये विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग दिघे मॅडमच्या मार्गदर्शनाखाली होता. हरियाली या संस्थेमार्फत वृक्षारोपणाचे संस्कार देखील मॅडमनी मुलांवर रुजवले. प्लास्टर ऑफ पॅरिस न वापरता शाडूच्या मातीपासून तयार केलेल्या मूर्ती या पर्यावरणपूरक असून त्यामुळे तलावाच्या पाण्याचा दर्जा उत्तम राहण्यास मदत होते यासंदर्भातील संशोधन प्रयोग राष्ट्रीय बाल विज्ञान परिषदेत १९९८ साली सादर करणारी जिज्ञासा ही पहिली संस्था होती. त्यानंतरच कृत्रिम तलाव ही संकल्पना अस्तित्वात आली. जनजागृतीसाठी पथनाट्यद्वारे मानवी साखळीद्वारे या चळवळीला हातभार लागला व कालांतराने ती समाजमान्य झाली.

पुढील पिढीमध्ये पर्यावरण संरक्षणाचे धडे देण्यासाठी गणपती बनवण्याच्या कार्यशाळा देखील घेतल्या. मुलांनी बनवलेला गणपती पूजा करून त्याच मूर्तीचे विसर्जन केले जाऊ लागले. त्यामुळे मुलांना फक्त उपदेश न देता त्यांना मदतीला घेऊन प्रयोगशीलतेने नवीन पिढीसमोर आदर्श ठेवल्यास त्यांच्यामधील सामाजिक भान जागृत होण्यास मदत होते, असे सुमिताताई आवर्जून सांगतात.

ठाण्यातील पहिल्या महिला प्रशिक्षित गिर्यारोहीका म्हणून ठाणे महानगरपालिका यांच्याकडून सुमिताताईंना सन्मानित करण्यात आले आहे. शैक्षणिक अभ्यासक्रम व उपक्रमाव्यतिरिक्त मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरलेल्या त्यांच्या या यशस्वी उपक्रमांप्रित्यर्थ त्यांना ठाणे नगररत्न पुरस्कार, नवदुर्गा पुरस्कार , व्यास क्रिएशन प्रकाशन संस्थेतर्फे ज्येष्ठ सेवा रत्न पुरस्कार तसेच पुढारी वृत्तपत्रातर्फे गौरवशाली स्त्री अशा नामांकित पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

आत्ताच्या पिढीला घडवण्याची सर्वात मोठी जबाबदारी ही आत्ताच्या आई-वडील असणाऱ्या पिढीवर आहे. दैनंदिन आयुष्य जगताना सामाजिक दायित्वाच भान राखून प्रसंगी पुढाकार घेऊन ते आद्य कर्तव्य देखील पार पाडले पाहिजे असे संस्कार त्यांना त्यांच्या आई-वडिलांकडूनच मिळाले, तर पुढची पिढी ही अधिक सक्षम आणि सजग बनेल. त्यांच्याशी संवाद साधला की तेही मनमोकळेपणाने आपल्याशी सगळं शेअर करतील असा मोलाचा सल्ला त्या सगळ्यांना देतात.

नेहमी उंच शिखरावर चढणारी आमची मुलं पण तरीही त्यांचे पाय हे नेहमी घट्ट जमिनीवर रोवलेले असतात आणि जमिनीवर पाय असतानाही समोर स्वप्नांच्या दिशेने शिखरांकडेही तितक्याच ध्येयपूर्तीच्या उद्देशाने त्यांचं लक्ष असतं असं सुमिताताई अभिमानाने सांगतात. त्यांच्यासोबत गिर्यारोहण केलेल्या मुलांची मुलं ही देखील आज त्यांच्या या वैविध्यपूर्ण उपक्रमांना उत्तम प्रतिसाद देत आहेत.

अशा या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी अविरत झटणाऱ्या, समर्पित भावनेने त्यांची आई होऊन त्यांच्यावर संस्कार करणाऱ्या दिघे मॅडम म्हणजे एक मार्गदर्शक संस्थाच आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील पिढीसाठी त्यांच्या प्रयोगशील उपक्रमांचा नंदादीप हा असाच अखंड तेवत राहो या सदिच्छेसह खूप शुभेच्छा.

Vaishu.gaikwad78@gmail.com



# उन्हाळ्यातसुद्धा ओठ फुटतात?

## या 'टिप्स' फॉलो करा

उन्हाळा सुरू झाला की, सर्वांनांच टेन्शन येतं. कारण त्याचा परिणाम आरोग्यावर होतो. पण हिवाळ्यात त्वचा कोरडी पडणे, ओठ फुटणे या सामान्य समस्या आहेत, मात्र उन्हाळ्यात ओठ फुटतात तेव्हा अनेकांना प्रश्न पडतो की असं का होतं? उन्हाळ्याच्या काळात आपल्याला त्वचेची सगळ्यात जास्त काळजी घ्यावी लागते. डिहायड्रेशनमुळे जितका शरीरावर परिणाम होतो तितकाच आपल्या त्वचेवर देखील होतो. त्वचेची काळजी घेण्यासाठी आपण अनेक ब्युटी उत्पादनाचा वापर करतो; परंतु ओठांचे सौंदर्य मात्र बिघडलेले असते. ओठ काळे पडणे, फाटणे किंवा कोरडे पडणे यांसारख्या समस्यांना आपल्याला सामोरे जावे लागते. तर आज आपण उन्हाळ्यात ओठ का फुटतात याबद्दल जाणून घेणार आहोत.



उन्हाळ्यात ओठ फुटण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे बदलते वातावरण, बदलत्या वातावरणाचा शरीरावर जसा परिणाम पडतो, तसा ओठांवर देखील होतो. गुलाबी आणि मुलायम ओठ असावे अशी प्रत्येक महिलेची इच्छा असते आणि यासाठी अनेक मुली व महिला महागड्या उत्पादनाचा उपयोग करतात. पण या लेखातून आपण जाणून घेऊया काही सोपे घरगुती उपाय ज्याने उन्हाळ्यात ओठांची काळजी आपल्याला चांगल्या पद्धतीने घेता येईल.

**खोबरेल तेल :**
खोबरेल तेल केवळ त्वचेचे पोषण करत नाही, तर त्वचेची प्रतिकारशक्तीही वाढवते. कापसाच्या तुकड्याने किंवा स्वच्छ बोट खोबरेल तेलात बुडवून थेट ओठांवर झोपण्यापूर्वी लावा आणि सकाळपर्यंत तसेच ठेवावे.





सौंदर्य तुझं
प्राची शिरकर

**लिप बाम :**
आपल्या ओठांना मऊ आणि मॉइश्चरायझ करण्यासाठी उत्तम असे लिप बाम वापरा. यामुळे आपले ओठ फुटणार नाही तसेच निरोगी देखील राहतील.

**मध :**
मध केवळ ओठांना मॉइश्चराइझ करत नाही, तर फाटलेल्या ओठांना जळजळीपासूनही आराम देतो. ओठ फाटण्यावर मध हा प्रभावी घरगुती उपाय आहे. ओठांवर मधाचा थर लावा, १०-१५ मिनिटे ठेवा. नंतर हलक्या हाताने पुसून टाका.



**लिपस्टिकचा वापर :**
लिपस्टिकचा वापर जास्त प्रमाणात केल्याने ओठ कोरडे होतात. यासाठी जेव्हा ओठांना आपण लिपस्टिक लावतो तेव्हा ती काढण्यापूर्वी त्यावर लिप बाम लावा ज्यामुळे आपले ओठ कोरडे होणार नाहीत.

**दही :**
ओठांची त्वचा अधिक कोरडी आणि निस्तेज झाली असेल, तर त्यावर दही लावू शकता. कमीत कमी १५ मिनिटे ठेवा. नंतर स्वच्छ पाण्याने धुवा, ज्यामुळे ओठ मुलायम आणि गुलाबी होतील.

**कोरफड जेल :**
कोरफडमध्ये व्हिटॅमिन ई आणि इतर पोषक घटक आढळतात. जे आपल्या ओठांना निरोगी ठेवण्यास मदत करतात. कोरफड ओठांसाठी नैसर्गिक उपाय आहे. कोरफडमध्ये ओलावा टिकवून ठेवण्याची आणि दाहक-विरोधी गुणधर्म आहेत. ज्यामुळे त्वचा मऊ होण्यास मदत होते.

**भरपूर पाणी प्या :**
ओठ निरोगी आणि हायड्रेट ठेवण्यासाठी पाणी पिणे महत्त्वाचे आहे. शरीरात पाण्याची कमतरता असल्यास ओठ कोरडे पडू लागतात. यासाठी दिवसभरात शक्य होईल तितके पाणी प्या.

**तूप:**
उन्हाळ्यात एक नैसर्गिक मॉइश्चरायझर म्हणून तूप काम करते. याच्या वापरामुळे ओठ मऊ, कोमल आणि हायड्रेट राहतात. रात्री झोपण्यापूर्वी ओठांवर थोडे तूप लावल्यास सकाळपर्यंत त्यांचा कोरडेपणा कमी होतो.

# आंबे डाळ आणि कैरीचे पन्हे

उन्हाळा म्हणजे अंगावर येणारी उष्णता, पण त्याचबरोबर येतात थंडावा देणारे पारंपरिक पेय आणि पदार्थ. महाराष्ट्रात उन्हाळ्याचे स्वागत कैरीपासून बनवलेल्या विविध पदार्थांनी केले जाते. कैरीमध्ये असलेले पाचक गुणधर्म आणि उष्णता कमी करणारी तासीर हिचे प्रमुख कारण आहे. या ऋतूत दोन अतिशय लोकप्रिय आणि चविष्ट पदार्थ म्हणजे आंबे डाळ आणि कैरीचे पन्हं.



सुग्रास सुगरण
गायत्री डोंगरे

**१. आंबे डाळ**

**साहित्य :**

**हरभऱ्याची डाळ** :- १ कप (४-५ तास भिजवून निथळलेली)
**कैरी (कच्ची, आंबट)** :- १/२ कप किसलेली
**हिरव्या मिरच्या** :- २-३ (कापून)
**ओले खोबरे** :- २ टेबलस्पून
**साखर** :- १ टेबलस्पून (ऐच्छिक)
**मीठ** :- चवीनुसार
**कोथिंबीर** :- बारीक चिरलेली
**हिंग** :- एक चिमूटभर
**मोहरी** :- १ टीस्पून
**कढीपत्ता** :- ५-६ पाने
**तेल** :- १ टेबलस्पून



**कृतीः** भिजवलेली डाळ मिक्सरमध्ये थोडी जाडसर वाटून घ्या (पूर्ण वाटायची नाही). त्यात किसलेली कैरी, मिरच्या, खोबरे, साखर, मीठ आणि कोथिंबीर मिसळा. एका पातेल्यात तेल गरम करून त्यात मोहरी फोडा. मग त्यात हिंग, कढीपत्ता घाला आणि हे फोडणीचं मिश्रण डाळीवर ओता. सर्व नीट मिसळा आणि थंडसर आंबटसर आंबे डाळ तयार!



**२. कैरीचं पन्हं**

**साहित्य :**

कच्च्या कैऱ्या :- २ मध्यम आकाराच्या
साखर :- १ कप (कैरीच्या आंबटपणावर अवलंबून)
वेलदोडा पूड :- १/२ टीस्पून
मीठ :- एक चिमूटभर
पाणी :- ३-४ कप (ऐच्छिक घट्टपणा पाहून)

**कृतीः** कैऱ्या उकडून घ्या (किंवा प्रेशर कुकरमध्ये २ शिट्या). थंड झाल्यावर गर वेगळा करून मॅश करा किंवा मिक्सरमध्ये थोडं फिरवून घ्या. त्यात साखर, मीठ, वेलदोडा पूड टाका व नीट मिसळा. आता हे मिश्रण गाळून पाण्यात मिसळा (आपल्या हव्याशा घट्टपणानुसार). थोडं बर्फ टाकून थंडगार पन्हं सर्व्ह करा. उन्हाळ्यात शरीराला थंडावा देण्यासाठी हे पारंपरिक पदार्थ अत्यंत फायदेशीर आहेत. आंबे डाळ ही एक प्रथिनयुक्त आणि पाचक कोशिंबीर आहे, तर पन्हं उष्णता कमी करून शरीराला ऊर्जा देतं. ही रेसिपी तुमच्या उन्हाळ्याच्या जेवणात नक्कीच रंगत वाढवेल!

# प्राणायाम

- भाग ३

नित्य योगसाधनेत अंतर्भूत करायच्या प्राणायामांचा विचार आपण मागील दोन लेखांमध्ये तसेच प्रस्तुत लेखातही केला आहे.

१. सूर्याभ्यास प्राणायाम : अभ्यास म्हणजे एखादी गोष्ट पुन्हा पुन्हा करणे.

कृती : उजवी नाकपुडी सूर्यनाडीशी संबंधित असते. त्यामुळे सूर्याभ्यास प्राणायाम करताना डावी नाकपुडी बंद करून उजव्या नाकपुडीनं पूरक केले जाते आणि उजव्या नाकपुडीनेच रेचक केले जाते.

लाभ : या प्राणायामाने उष्णता वाढते आणि काम करण्याचा उत्साह निर्माण होतो.

मरगळ निघून जाते.

२. चंद्राभ्यास प्राणायाम :

कृती : डावी नाकपुडी चंद्रनाडीशी संबंधित असते. त्यामुळे चंद्राभ्यास प्राणायाम करताना उजवी नाकपुडी बंद करून डाव्या नाकपुडीने पूरक केले जाते आणि डाव्या नाकपुडीने रेचक केले जाते.

**लाभ :**

१. या प्राणायामाने शीतलता वाढते आणि उजवा मेंदू घडवला जातो.

२. मनःशांतीचा लाभ मिळतो.



मी योगिनी
डॉ. वैशाली दाबके

३.सूर्यभेदन प्राणायाम :

या प्राणायामात उजव्या नाकपुडीने पूरक आणि डाव्या नाकपुडीने रेचक केले जाते. हे या प्राणायामाचे एक आवर्तन होय.

**लाभ :**

१. हा प्राणायाम केल्याने सायनस इत्यादी विकार तसेच वातदोष, कृमीदोष नष्ट होतात.

२. सूर्याभ्यासाप्रमाणे हाही उष्णतावर्धक प्राणायाम आहे.

३. सूर्यभेदन प्राणायाम करण्यापूर्वी सूर्याभ्यास प्राणायाम करावा.

४. चंद्रभेदन प्राणायाम :

या प्राणायामात डाव्या नाकपुडीने पूरक आणि उजव्या नाकपुडीने रेचक केले जाते. असे केले असता या प्राणायामाचे एक आवर्तन पूर्ण होते.

चंद्राभ्यासाचे सर्व लाभ या प्राणायामाने देखील मिळतात.

५. भ्रामरी प्राणायाम :

याला चिदानंदकारी प्राणायाम असंही म्हणतात. कारण या प्राणायामामुळे चैतन्य आणि आनंद यांची अनुभूती येते.

कृती

१. डोळे अलगद मिटून पूरक करावे.

२. किंचित थांबून, पोट आतमध्ये घेत रेचक करताना भुंग्याच्या गुंजनाप्रमाणे आवाज करावा.

३. या नादाशी आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या कंपनांशी एकरूप होण्याचा प्रयत्न करावा.

४. हा प्राणायाम, कानात हाताचा अंगठा घालून व हाताची उर्वरित चार बोटं डोळ्यांवर ठेवूनही केला जातो. प्राणायाम करताना इतर कुठेही लक्ष न जाता नादावरच केंद्रित व्हावे यासाठी ही क्रिया केली जाते; परंतु सरावानं याची आवश्यकता पडत नाही.

**लाभः**

१. या प्राणायामादरम्यान नादामुळे चटकन समरसता येते जी एकाग्रतेसाठी उपकारक ठरते.

२. निद्रानाशाच्या विकारावरही या प्राणायामाचा उपयोग होतो.

३. या प्राणायामात केल्या जाणाऱ्या नादामुळे जी कंपने निर्माण होतात त्यामुळे पेशींना मृदू मर्दन होते.

६. शीतली प्राणायाम : नावाप्रमाणेच शरीरात शीतलता निर्माण करणारा हा प्राणायाम आहे.

**कृती :**

१. जीभ बाहेर काढून पन्हाळीप्रमाणे वरच्या दिशेने वळवावी.

२. तोंडाने जीभेच्या पन्हाळीद्वारे पूरक करावे आणि नाकाने रेचक करावे.

**लाभ :**

१. तहान भागते.

२. उत्साह मिळतो व झोप कमी होते.

३. शरीरातील शीतलता वृद्धिंगत होते.

४. पित्तदोष कमी होतो.

७. सीत्कारी प्राणायाम : या प्राणायामात तोंडाने सीत् असा आवाज करत पूरक केलं जातं म्हणून याला सीत्कारी असं म्हणतात.

**कृती**

१. दात एकमेकांवर ठेवावेत.

२. जीभ दाताच्या मागे, टाळूला लावावी.

३. सीत् असा आवाज करत पूरक करावे आणि नाकाने रेचक करावे.

लाभ : १. आळस जातो.



२. तहान कमी होते.

३. झोप कमी होते.

४. उत्साह मिळतो.

५. शीतलता वाढते.

प्राणायामावरील दुसऱ्या लेखात म्हटल्याप्रमाणे प्राणायामाचे एकूण बारा प्रकार आहेत; परंतु हे सर्व रोजच्या रोज करणं शक्य नाही म्हणूनच नित्यसाधनेत अंतर्भूत करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्राणायामांचा विचार या तीन लेखांत केला आहे. पातंजल-योगसूत्रांनुसार प्राणायामाचा मुख्य उद्देश श्वासावर नियंत्रण आणून त्यायोगे मनाला नियंत्रित करणे हा आहे. मनाला नियंत्रित करणं ही अष्टांग योगातील प्रत्याहार, धारणा इत्यादी पुढील पायऱ्यांची म्हणजेच अंतरंग योगाची पूर्वतयारी होय.

मात्र आजच्या जीवनात पातंजलयोगाची आठही अंग आत्मसात करणं हा उद्देश कोणाचा सहसा दिसून येत नाही तर शरीर आणि मनाचं उत्तम आरोग्य प्राप्त करणे हा आपल्या जीवनाचा सर्वसाधारणपणे उद्देश असतो. या दृष्टीने काही निवडक प्राणायामांचाच विचार या लेखांमध्ये केला.

मन शांत होणे, श्वसनक्षमता वाढणे, पचनसंस्था, रक्ताभिसरणसंस्था, श्वसनसंस्था यांचं आरोग्य उत्तम राहणे इत्यादी सर्वच प्राणायामांचे समान लाभ आहेत; परंतु प्रत्येक प्राणायामाचे विशेष असेही लाभ आहेत ज्यांच्या निर्देश प्राणायामांवरील विवेचनात केला आहे. एकूणच आसन आणि प्राणायाम यांची योग्य सांगड घातली, तर शरीर आरोग्य आणि मानसिक आरोग्य उत्तम राहतं आणि देह-मन संवादही निर्माण होतो.

# जात सोडण्यातच बहुजनांचे हित

प्रा.सुकुमार कांबळे

परळीत जयभीम महोत्सव





पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी: जात हे विष आहे, जातीव्यवस्थेची ही विषवल्ली समूळ नष्ट करण्यातच बहुजनांचे हित आहे असे प्रतिपादन प्रा सुकुमार कांबळे यांनी केले.

राष्ट्रनिर्माता डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक आदर्श जयंती उत्सव समिती, परळी आयोजित परळी भिमजयंती महोत्सव २०२५ येथील रेल्वे स्टेशन मैदान येथे गेल्या १६ एप्रीपासून सुरु असून काल दि २१ एप्रील रोजी, प्रा सुकुमार कांबळे यांचे वंचिताचे मुक्तीदाता डॉ आंबेडकर याविषयावर त्यांचे जाहिर व्याख्यान झाले त्यावेळी ते बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा विलास रोडे हे होते.

प्रा सुकुमार कांबळे हे आपल्या व्याख्यानात पुढे म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी या देशात सामाजिक समता व सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी सत्याग्रह आदोलने केली. धर्माने शिक्षण, समता नाकारलेल्या बारा बलुतेदार व अठरा आलुतेदार यांना संविधानात सूचीबद्ध केले व अनु.जाती, अनु.जमाती व ओबीसी अशी ओळख दिली, यांनाच आपण वंचित समुदाय मानतो. पुढे बोलताना प्रा कांबळे म्हणाले की, वंचितांना फक्त डॉ आंबेडकर सूचीबद्धच करून थांबले नाहीत, तर भारतीय संविधानात त्यांना शैक्षणिक, नोकरीविषयक आरक्षणाची सोय केली. शोषित, पीडित घटकांनी शिक्षण व नौकऱ्या आरक्षणातून मिळविल्या पण डॉ आंबेडकरांच्या चळवळीपासून दूरच राहिले. मैत्रीआणि बुद्धाच्या करुणामय भावनेतून त्यांच्या मध्ये जाऊन त्यांना या समतेच्या चळवळीत सहभागी करून घ्यावे लागेल. या कार्यक्रमाला ज्येष्ठ नेते भास्करनाना रोडे, मिलिंद घाडगे,अजय गंडले, भगवान साकसमुद्रे, राजाभाऊ जाधव, लक्ष्मण वैराळ, पत्रकार विकास वाघमारे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा दासू वाघमारे यांनी केले, तर प्रस्तावना प्रा प्रदीप बुक्तर सर तर आभार एच टी वाघमारे सर यांनी मानले.

## वैजेनाथ ट्रस्टीच्या विरोधात रोष

संतप्त:रमेश फडांचे मुंडन आंदोलन



पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:श्री वैजनाथ देवस्थान ट्रस्टच्या मनमानी कारभाराविरोधात आणि भाविकांच्या भावनांचा विचार न केल्यामुळे, रमेश फड यांनी २० एप्रिल २०२५ रोजी (रविवार) उत्तर पाय–या समोर निषेध म्हणून डोक्यावरील केसांचे मुंडन केले. यानंतर, ते २८ एप्रिल २०२५ रोजी (सोमवार) सकाळी ११ वाजता श्री वैजनाथ मंदिरातील अहिल्याबाई होळकर यांच्या पुतळ्याजवळ आत्मदहन करणार आहेत.३० एप्रिल रोजी अक्षय तृतीया साजरी केली जाते. या दिवशी सूर्याच्या किरणांचा पिंडीवर पडणारा योग हा अत्यंत शुभ मानला जातो. त्यामुळे या दिवशी पूर्व दरवाजातून मंदिराचे दर्शन घेणे भक्तांसाठी अत्यंत पवित्र मानले जाते. अनेक भाविकांची भावना आहे की, ३० एप्रिल २०२५ पूर्वी श्री वैजनाथ मंदिराचा पूर्व दरवाजा दर्शनासाठी खुला करावा.

तसेच, मंदिरासमोरील जड व अवजड वाहतुकीवर बंदी घालावी. मंदिरातील सर्व टेंडर प्रक्रियेची, तसेच देवस्थानच्या दुकानांची आणि तीर्थक्षेत्र योजनेअंतर्गत मिळालेल्या विकास निधीची सविस्तर माहिती उपलब्ध करून द्यावी.या मागण्यांसाठी पान २ वर

## महिलेचा विनयभंग करत मारहाण

कारवाई:जिवे मारण्याची धमकी ;गुन्हा दाखल

पुण्यभूमी प्रतिनिधी



तलवाडा:बीड जिल्ह्यातील मासाजोग येथे संतोष देशमुख यांना बेदम मारहाण करून निर्घुणपणे त्यांची हत्या केल्याच्या प्रकरणाने अगोदरच जिल्ह्यात खळबळ उडालेली असताना, आता गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील ठाकर आडगाव येथे दारू पिऊन घरात घुसलेल्या चौघांनी घरातील महिलेचा विनयभंग करत बेदम मारहाण केली. घरातील साहित्य व भांड्यांचीही नासधूस करून, आमच्या नादी लागल तर जीवे मारून टाकू अशी जीवे मारण्याची धमकी दिल्याचा संताप जनक प्रकार घडला आहे. पीडितांच्या अंगावर मोठमोठे वळ उठेपर्यंत मारहाण करण्यात आली आहे. याप्रकरणी तलवाडा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांनी दिलेली अधिक माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील ठाकर आडगाव येथील आशाबाई वैजिनाथ कोकाट, वय ५१ वर्ष या आपल्या घरी पती वैजिनाथ कोकाट आणि मुले अनिल व कृष्णा यांच्यासोबत शेती व्यवसाय करून उपजीविका भागवतात. दिनांक २२ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ८ पान २ वर

## परळीत सर्पमित्राचे मोठे धाडस

सतर्क:९ फूट लांबीची धामीन पकडली

पुण्यभूमी प्रतिनिधी



परळी:तीव्र तापमानामुळे आता सरपटणारे प्राणी ही नाल्या आणि पाणथळ जागी आसरा घेत आहेत. असे इकडून तिकडून जातानाच ते लोकांच्याही नजरेस पडत असल्यामुळे नागरिकात घबराट होत आहे.

तप्त हवामानामुळे अनेक सरपटणारे जीव उष्णतेपासून वाचण्यासाठी पाण्याच्या जागा जवळ करत असल्याचे चित्र दिसून येत आहे. परळी शहरातील धनंजय आरबुने यांच्या घराच्या कंपाउंड लगत असलेल्या नाल्यातील बिळात सुमारे नऊ ते दहा फूट लांबीची धामीन आज दिसून आली. यावेळी सर्पमित्र नितीन यास तात्काळ फोन लावून बोलावून घेतले. त्यांनी येऊन ही धामीन आपल्या ताब्यात घेतली. बिळातून तिला बाहेर काढताना तिला थोडसं खरचटल तेव्हा दया भावनेने तिच्यावर हळद उपचार करून तिला पुन्हा दूर वणामध्ये सोडनार असल्याचे त्यांनी सांगितल. तर नागरिकांनी कुठल्याही प्रकारचा साप दिसून आल्यास त्याला मारू नका अशी विनंती ही त्यांनी यावेळी केली.

## चिंचोली माळीत धाब्यावर कार्यवाही!

दणका:बातमीची प्रशासनाने घेतली दखल

पुण्यभूमी प्रतिनिधी



केज:तालुक्यातील चिंचोली माळी येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक तसेच शासकीय कार्यालयांच्या समोर सुमार अवैध दारू विक्री करण्यात येत आहे अशा बातम्या दैनिक पुण्यभूमी वृत्तपत्रांच्या माध्यमातून प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या तरी पी.आय पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली बीट अंमलदार बांगर साहेब ,कागदे साहेब तसेच भांगे साहेब ,गोरे साहेब यांनी धडाकेबाज कामगिरी बजावली आहे व अवैध दारू करणाऱ्या धाब्यावर कार्यवाही केली आहे केज पोलीस प्रशासनाने धडाकेबाज कामगिरी केली आहे तरी केज पोलीस प्रशासनाच्या कामगिरी बजावली आहे ही कामगीरी चिंचोली माळी येथील कार्यवाही पुरती मर्यादीत नसून केज पोलीस प्रशासनाची कामगिरी केज तालुक्यात कौतुकास्पद आहे अशीच धडाकेबाज कामगिरी केज पोलीस प्रशासनाने केली तर नक्कीच केज तालुक्यातील दारु प्राशन करून होणाऱ्या गुन्हेगाऱ्या कमी होतील तसेच तरुण पिढी परबाद होत चालली आहे यांना सुध्दा आवर बसेल तरी केज पोलीस प्रशासनाने अशा कार्यवाही केल्या पाहिजेत असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे तरी केज पोलीस प्रशासनाने चिंचोली माळी येथील अवैध दारू विक्री करणाऱ्या धाब्यावर कार्यवाही केल्या पान २ वर

## पोलीसांनी आरोपींना ठोकल्या बेड्या

कारवाई:आरोपींना पाच दिवसाची कोठडी



पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव:बिलाच्या वादावरून हॉटेल मालकाचा खून झाला होता यातील मुख्य आरोपी असलेल्या रोहित शिवाजीराव थावरे ऋषिकेश रमेशराव थिवरे कृष्णा माणिकराव थावरे राहणार आनंदगाव यांना मंगळवार दिनांक २२ रोजी पहाटे आळंदी पुणे येथून स्थानिक गुन्हे शाखेच्या कर्मचाऱ्यांनी ताब्यात घेतले आहे. न्यायालयात हजर केली असता पाच दिवसाचे पोलीस कोठडी सुनावलेली आहे.

माजलगाव येथील परभणी रोडवर महादेव गायकवाड यांचे गावरान दावा नावाचे हॉटेल आहे या हॉटेलवर रोहित शिवाजीराव थावरे आणि त्याचे इतर दोन मित्र असलेले आरोपी ऋषिकेश थावरे आणि कृष्णा थावरे यांचा पान २ वर

## पुरवठा विभागा करणार पडताळणी

श्रीमती माळवे:तालुका प्रशासनाचे नियोजन




### धान्य उचलणाऱ्या

पुरवठा विभागाने आता अन्नसुरक्षा अथवा अंत्योदय योजनेत धान्य उचलणाऱ्या लाभार्थ्यांनी स्वतःहून लेखी फार्म भरून देण्याचे आवाहन केले आहे. हे आलेले फॉर्म स्वस्त धान्य दुकानदार खात्री करून पुरवठा विभागाला कळवणार आहेत त्यानंतर पुरवठा विभाग त्याची पडताळणी करेल यामध्ये अधिक उत्पन्न आढळल्यास शिधापत्रिका थेट रद्द केली जाणार आहे तसेच अंत्योदय, प्राधान्य,एपिएल तसेच शुभ्र काटधारकांची संख्या मोठी आहे यामध्ये अंत्योदय, प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांना रेशनच्या धान्याचा लाभ रेशन दुकानाच्या माध्यमातून मिळणार आहे. कळंब पुरवठा निरीक्षण अधिकारी श्रीमती. शिल्पा माळवे

पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब:तालुक्यातील स्वस्त धान्याचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्याचा शोध मोहीम १ एप्रिल ते ३१ मे २०२५ पर्यंत राबविण्यात येणार आहे या अंतर्गत रेशन कार्ड धारकांच्या वार्षिक उत्पन्नासह रहिवासी पुराव्याची पडताळणी होणार आहे हा पुरावा नसल्यास रेशन कार्ड रद्द होणार व खोटी माहिती दिल्यास संबंधितावर कार्यवाही होण्याची शक्यता आहे असे कळंब पुरवठा विभागाचे निरीक्षण अधिकारी श्रीमती. शिल्पा माळवे यांनी माहिती दिली आहे या मोहिमे अंतर्गत ज्याचे उत्पन्न अधिक आहे अथवा ज्यांना ज्या पत्त्यावर शिधापत्रिका देण्यात आलेले आहे ते त्या पत्त्यावर राहत नसतील तर अशा लाभार्थ्याचा शोध मोहिमेच्या माध्यमातून घेतली जाणार आहे तसेच अशा ठिकाणी लाभार्थ्याचा मृत्यू झालेला आहे तरीही त्याच्या नावाने धान्य उचलले जात आहे त्यामुळे अशा मृत लाभार्थ्याचा नावेही मोहिमेत वगळली जाणार आहेत यासाठी लाभार्थ्याकडून आता पुरवठा विभागाकडून एक फार्म भरून घेणार आहेत यामध्ये 'अ ' पान २ वर

## चोरट्यांनी मारला लाखोंचा डल्ला

चोरी:नाथापुरमध्ये भयभित वातावरण

पुण्यभूमी प्रतिनिधी

नाथापूर:बीड तालुक्यातील नाथापुर या गावी दि. २१ रोजी रात्री गिराम संतोष रामप्रसाद यांचे घर चोरट्याने फोडून घरातील कपाटातून चार तोळे सोने व नगदी १४ हजारांची रोख रक्कम असा लाखोंचे सामान पसार केला आहे. सदरील घर नाथापूर येथील भोई गल्ली च्या एका बाजूला असल्यामुळे चोरट्याने त्याचा फायदा घेतला विशेष घरातील सर्व उन्हाळा असल्यामुळे घराच्या स्लॅब वर झोपले होते व घर मालक हा लाईट खात्यात ऑपरेटर म्हणून असल्याने ते ड्युटीवर होते.या गावात वर्षातून एक दोन वेळेस घर फोडी नक्कीच होते,परंतु आतापर्यंत एकही चोरीचा तपास लागलेला नाही. या भागात अवैध धंदा तर खूपच बोकाळलेला आहे, नवीन आलेल्या पिंपळनेर पोलीस स्टेशन च्या पी एस आय पूजा पवार मॅडम यांनी याकडे लक्ष द्यावे व नाथापूर व परिसरात रात्रीची गस्त चालू करावी अशी या भागातील लोकांची मागणी आहे. नाथापुराच्या आठवडी बाजार दिवशी पण मोबाईल चोरट्याचे प्रमाण वाढलेले आहे. आज रोजी सकाळी रीतसर पंचनामा झाला असून याप्रसंगी बीट आमालदार मिसाळ व त्यांचे सहकारी विशेष म्हणजे प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक पूजा पवार ह्या स्वतः उपस्थित होत्या मॅडमकडून या तपासाची वाटचाल योग्य दिशेने होऊन या चोरीचा तपास लवकरच लागेल अशी गावकऱ्यांनी अपेक्षा व्यक्त केली आहे

आक्रमक

लोकशाही बचाव समितीची आंदोलनाची हाक

# जनसुरक्षा विधेयकाला विरोध

पुण्यभुमी प्रतिनिधी



राहुरी:महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक मंजूर करू नये या विशेष मागणी करिता राहुरी तहसील कार्यालयावर विविध राजकीय सामाजिक पक्ष व संघटना यांच्या वतीने लोकशाही बचाव समन्वय समिती गठीत करून भारतीय लोकशाहीच्या समर्थनात तसेच संविधानाच्या चौकटीमध्ये न बसणारे विधेयक शासन मंजूर करून पाहत आहे या विधायकाला विरोध करण्यासाठी २८/४/२०२५रोजी भव्य विराट भारत बचाव जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

देशाच्या स्वतंत्र पूर्वी ब्रिटिश कार्यकाळात रॉ रेट कायदा सन १९१९मध्ये देशावर घातला गेला होता हा कायदा रद्द करण्यासाठी संपूर्ण देश एकवटला होता तसाच महाराष्ट्र विषय जन सुरक्षा अधिनियम २०२४ हा मंजूर करण्याच्या तयारीत सरकार असून या कायद्यामुळे सरकार टीका करणे आंदोलने करू शकणार नाही सरकारला जाब विचारला जाऊ शकणार नाही व्यक्ती आणि संघटने यांच्या बेकायदेशीर कृत्यांना प्रभावीपणे प्रतिबंध घालावा यासाठी प्रभावीपणे तरतूद करण्यात आलेली आहे कोणालाही संशयावरून ताब्यात घेण्याचे अमर्यादा अधिकार सरकारला राहणार आहे तीन लाख रुपये दंड तीन वर्षे शिक्षा करण्याची तरतूद या कायद्यात आहे. जनतेच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्य जे संविधानाने जनतेला मिळाले आहे ते हिरावून घेतले जाऊ शकते देशाची वाटचाल हुकुमशाही कडे चालली काय असा प्रश्न जनतेला पडणे साहजिक आहे हे विधायक मंजूर पान २ वर

## राजनंदीनी ट्रेडिंग कंपनी बंद?

दखल:पुण्यभूमीच्या बातम्यांचा दणका




पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील शेतकऱ्यांना लुटणाऱ्या राजनंदीनी ट्रेडिंग कंपनी वर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी शेतकरयांन कडुन वारंवार करण्यात येत होती परंतु जैसे ज्याचे कर्म तैसे फळ देतो ईश्वर या अभंगवाणी प्रमाणे राजनंदीनी ट्रेडिंग कंपनीचा गाशा गुंडाळला गेला आहे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे या विषयी तक्रार द्वारे सविस्तर असे म्हटले आहे की केज येथील राजनंदीनी ट्रेडिंग कंपनी शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात येत होती अशा बातम्या दैनिक पुण्यभूमी वृत्तपत्रांच्या पान २ वर